


दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

1,22,570
डिजिटल प्रतींचे दररोज
सोशल मीडियाच्या
माध्यमातून वितरण होणारे
पुण्यातील
लोकप्रिय दैनिक



• वर्ष : ०३ • अंक : १८५ • पुणे • मंगळवार, दि. २४ मार्च २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313




श्री.शांताराम साधू मते



श्री.विलास तुकाराम मते



श्री.सुरेश तुकाराम मते



श्री.अनिल मारुती मते



श्री.जयनाथ कालिदास मते



श्री.सुमित खंडू मते



श्री.चंद्रशेखर साधू मते



श्री.विकास अरुण रायकर



श्री.अमित अंकुश रणधीर



सौ.सुनिता दिलीप मते



सौ.लक्ष्मीबाई पांडुरंग मते

## शेतकऱ्यांचा विश्वास... विकासाचा विजय..!

यशवंत विविध कार्यकारी सेवा संस्था मर्यादित, खडकवासला
पंचवार्षिक निवडणूक 2026-2031 मध्ये

## श्री भैरवनाथ शेतकरी ग्रामपरिवर्तन पॅनेलच्या सर्व विजयी उमेदवारांचे हार्दिक अभिनंदन व सर्व मतदार बंधू-भगिनींचे मनःपूर्वक आभार!

पॅनलप्रमुख

## श्री.संदिप पाटीलबुवा मते

मा.उपसरपंच, खडकवासला



शुभेच्छुक : श्री.भैरवनाथ शेतकरी ग्रामपरिवर्तन पॅनल व समस्त ग्रामस्थ, खडकवासला

# वणवे रोखा निसर्गसंपदा वाचवा!

उन्हाळा जसा तापू लागतो तसे वन खात्याच्या जंगलांना आगी लागण्याच्या घटनात वाढ होते. आताही राज्यात कोठेणा कोठे वन खात्याच्या जंगलांना आगी लागून वणवे पेटल्याच्या बातम्या वर्तमान पत्रात वाचायला मिळतात. काही वेळा या आगी वेळीच आटोक्यात येतात पण बऱ्याचदा या आगी वेळीच आटोक्यात न आल्याने त्या रौद्र रूप धारण करतात आणि त्याचे रूपांतर मोठ्या वणव्यात होते आणि त्यात बहुमोल अशी निसर्ग संपदा जळून खाक होते. तीन वर्षापूर्वी गोव्यातील महादयी वन्यजीव अभयारण्याला भीषण आग लागली होती. जगातील आठ जैवविविधता हॉटस्पॉट पैकी एक असलेल्या पश्चिम घाटाचा हा विस्तिर्ण भाग गोव्याच्या इतिहासातील सर्वात भीषण आगीमुळे उध्वस्त झाला होता. मागील वर्षी पुणे जिल्ह्यातील वन खात्याच्या जंगलातही वणवे पेटण्याच्या अनेक घटना घडल्या त्यात शेकडो एकर जंगलातील बहुमोल अशी निदर्गसंपदा जळून खाक झाली होती. आताही पुण्यातील पुण्यातील वनखात्याच्या जंगलात वणवे पेटल्याच्या बातम्या वर्तमान पत्रात वाचायला मिळत आहेत. वणवा पेटला की त्यात निसर्गाची कधीही न भरून येणारी हानी होते. साधारणतः उन्हाळ्यात या आगी लागतात आणि वणव्यांमुळेच या आगी लागतात. सामान्यतः सदाहरित जंगलांमध्ये आगी लागत नाही आग लागली तरी ती आपोआप विझतेही मात्र जोराने वारे वाहत असतील तर आग लवकर विझत नाही उलट ती आणखी वाढते. वनांमध्ये वाळलेले लाकूड, पाने, गवत असे अनेक घटक ठिणगीच्या संपर्कात येताच आग भडकते. मग झाडे पेट घेतात आणि मग मोठ्या वेगाने हा वणवा सर्वत्र पसरतो. डोंगराळ भागाचा भूगोल आणि भूरचना जटिल असल्यामुळेही वणवे विझवण्यात अनेकदा अडथळे येतात. गोव्यात तेच झाले. दुर्गम परिसर आणि खडे चढण यामुळे तेथील आग विझवण्यात अडचण आल्याचे सांगितले गेले. अर्थात जंगलांना आगी लागण्याच्या या घटना नव्याही नाहीत. गेल्या काही वर्षात वणवे लागण्याचे प्रमाण ज्याप्रकारे वेगाने वाढत आहे तो एक नव्या संकटाचा इशारा आहे. नैसर्गिक कारणामुळे जंगलांना वणवे लागण्याच्या घटना तर घडतातातच पण मानवनिर्मित वणवे



लागण्याचा घटनांची संख्याही प्रचंड आहे. दरवर्षी उन्हाळा आला की जंगलांना आग लागण्याच्या घटना घडतात आणि त्यात बहुमोल अशी निसर्गसंपदा नष्ट होते केवळ जंगलांनाच नाही तर डोंगर, पर्वत, टेकड्यांवरील वृक्ष, वेली देखील या वनव्यांनी नष्ट होतात. विविध महापालिका, नगरपालिका, जिल्हापरिषदा, ग्रामपंचायती, राज्य व केंद्र शासन, राजकीय, सामाजिक व सेवाभावी संघटना पावसाळ्यात वृक्षारोपण करतात. पावसाळ्यानंतरही ही वनसंपदा जतन करण्यासाठी या संघटना रोपट्यांना पाणी घालून ते वाढवतात. गाई, गुरे, बकऱ्यांपासून त्यांना जपतात. मात्र उन्हाळ्यात ठिकठिकाणी वणवे लागून व काही समाजकंटकामार्फत वणवे लावून वर्षानुवर्षे वाढवली गेलेली ही बहुमोल निसर्गसंपदा आगीच्या भक्ष्यस्थानी पडत असते. उन्हाळ्यात लागणारे हे वणवे नैसर्गिक असल्याचे भासवले जाते पण हे यातील बरेचसे वणवे मानवनिर्मितच असतात हे उघड सत्य आहे. काही समाजकंटक जाणीवपूर्वक शहराजवळच्या डोंगरावरील हिरवाईला वणवे लावून ती नष्ट करतात. चराई करिता चांगले गवत यावे या हेतूने हे वणवे लावले जातात. ( आग लागल्यावर चांगले व भरपूर गवत उगवते हा त्या मागचा उद्देश असतो. ) लाकूडफाटा, कोळसा मिळवण्यासाठी तसेच शेती व शिकारीसाठी जमीन तयार करण्यासाठी या बहुमोल निसर्ग संपदेला आगी लावल्या जातात. या आगीत वृक्ष, वनस्पती, वन्य जीवांची हानी, स्थलांतर यामुळे जे नुकसान होत असते त्याची भरपाई होण्यास खूप वर्षाचा कालावधी जातो. निसर्गाची अपरिमित हानी होते. या आगीमुळे पर्यावर्णाची हानी तर होतेच पण कार्बनडायऑक्साईडही वातावरणात वाढतो त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. एकूणच झाडांना लावल्या जाणाऱ्या या आगी म्हणजे राष्ट्रीय हानी आहे. असे असतानाही या मानवनिर्मित वणव्यांकडे केंद्र व राज्याचे वने आणि पर्यावरण खाते, पोलिसखाते दुर्लक्ष करीत असतात. आगी लावणाऱ्या या समाजकंटकांवर पोलीस तसेच प्रशासन कोणतीही कारवाई करीत नाही त्यामुळेच वणव्यांच्या घटनांत वाढ होताना दिसत आहे. काही भ्रष्ट कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामुळे निसर्गाची कधीही भरून न निघणारी हानी होत आहे, म्हणूनच सरकारने या वणव्यांची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. वणवे लावून पर्यावरणाची हानी करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई व्हायला हवी. वणव्यांमुळे पर्यावरणाची होणारी हानी टाळायची असेल तर मानवनिर्मित वणवे रोखायलाच हवे.

# तृप्ती देसाई विरुद्ध रुपाली ठोंबरे पाटील आमने-सामने

## अशोक खरात प्रकरणावरून आरोप-प्रत्यारोपांची जोरदार फैरी

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

राज्यभरात गाजत असलेल्या अशोक खरात प्रकरणाला आता राजकीय रंग चढू लागला असून, पुण्यात सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई आणि राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)च्या नेत्या रुपाली ठोंबरे पाटील यांच्यात जोरदार आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. दोन्ही महिला नेत्यांनी एकमेकींवर गंभीर आरोप करत वातावरण अधिक तापवले आहे. भोंदू बाबा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोक खरात प्रकरणात तृप्ती देसाई यांनी आपणच महत्त्वाचे पुरावे प्रशासनापर्यंत पोहोचवले, असा दावा केला आहे.





त्यांनी सांगितले की, “५ मार्च रोजी ही माहिती माझ्याकडे आली होती. संबंधित व्यक्तींना पोलिस आणि मुख्यमंत्र्यांपर्यंत पोहोचण्यासाठी आम्ही मदत केली. पेन ड्राईव्हमधील पुरावे संबंधित यंत्रणांकडे दिल्यानंतरच कारवाईला वेग आला.”

देसाई यांनी पुढे पोलिसांच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. “खरातविरोधात वर्षभरापूर्वी तक्रारी होऊनही गुन्हा दाखल झाला नाही. नाशिक परिक्षेत्राचे तत्कालीन आयजी दत्तात्रय कराळे यांच्या कार्यकाळात खरातला संरक्षण मिळाले का?” असा थेट सवाल त्यांनी उपस्थित केला. तसेच, आयजी आणि खरात यांचा एकत्र फोटो सोशल मीडियावर पोस्ट करत त्यांनी या प्रकरणातील संशय अधिक गडद केला आहे.

दुसरीकडे, रुपाली ठोंबरे पाटील यांनी तृप्ती देसाई यांच्यावर थेट आर्थिक गैरव्यवहार आणि ‘तडजोडी’चा गंभीर आरोप करत खळबळ उडवली आहे. पाटील यांच्या म्हणण्यानुसार, अशोक खरात प्रकरणातील आक्षेपार्ह व्हिडिओ देसाई यांच्या ताब्यात आधीपासून होते. मात्र, ते सार्वजनिक करण्याऐवजी त्यांनी खरातच्या पत्नी आणि तत्कालीन महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांच्याशी आर्थिक तडजोड केली, असा दावा त्यांनी केला. या तडजोडीत कोट्यवधी रुपयांचा व्यवहार झाल्याचाही आरोप पाटील यांनी केला आहे.

“महिलांच्या हक्कासाठी लढण्याचा दावा करणाऱ्या तृप्ती देसाई यांनीच या प्रकरणात तडजोड कशी केली?” असा सवाल उपस्थित करत, या संपूर्ण प्रकरणाची एसआयटीमार्फत सखोल चौकशी करण्याची मागणी रुपाली पाटील यांनी केली आहे.

दरम्यान, या आरोपांवर प्रत्युत्तर देताना तृप्ती देसाई यांनी स्पष्ट केले की, “आमच्या प्रयत्नांमुळेच कारवाई झाली आहे. काही राजकीय महिला प्रसिद्धीसाठी विनाकारण बदनामी करत आहेत. पूर्ण माहिती नसताना आरोप करणे योग्य नाही.”

या आरोप-प्रत्यारोपांमुळे अशोक खरात प्रकरण अधिकच गुंतागुंतीचे बनले असून, आता या प्रकरणाची चौकशी कोणत्या दिशेने जाते याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. राजकीय आणि सामाजिक पातळीवर वाढत चाललेल्या या संघर्षामुळे येत्या काळात आणखी नवे खुलासे होण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

# आता सभापतीपदासाठी मोर्चेबांधणी; मिलिंद वाळंज आघाडीवर

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

पुणे जिल्हा परिषदेच्या अध्यक्ष आणि उपाध्यक्षपदाची निवडणूक प्रक्रिया पार पडल्यानंतर आता सर्वांचे लक्ष विषय समिती सभापतींच्या निवडीकडे लागले आहे. अध्यक्षपदी वीरधवळ जगदाळे (दौंड) आणि उपाध्यक्षपदी विवेक वळसे-पाटील (आंबेगाव) यांची वर्णी लागल्याने, आता प्रादेशिक समतोल साधण्यासाठी मुळशी , मावळ तालुक्याला झुकते माप मिळण्याची शक्यता आहे. यामध्ये पौड गटाचे तरुण सदस्य आर्किटेक्ट मिलिंद वाळंज यांचे नाव अग्रक्रमाने चर्चेत आहे. जिल्हा परिषदेत अजित पवार गटाच्या राष्ट्रवादी काँग्रेसचे निर्विवाद वर्चस्व असून, बांधकाम, समाजकल्याण, महिला व बालकल्याण आणि कृषी व पशुसंवर्धन या चार समित्यांच्या सभापतीपदासाठी इच्छुकांनी जोरदार



हालचाली सुरू केल्या आहेत. सर्व समित्या ग्रामीण विकासाच्या दृष्टीने अत्यंत महत्वाच्या मानल्या जातात. अध्यक्ष उपाध्यक्ष पद अनुभवी नेतृत्वाखाली दिल्याने खालील समित्यांसाठी युवा उमेदवारांची वर्णी लागण्याची शक्यता आहे . मिलिंद वाळंज , संतोष राऊत , तुषार थोरात, अमोल नलावडे यासारख्या युवा चेहऱ्यांना संधीची शक्यता असून त्यामध्ये मिलिंद वाळंज हे स्वतः आर्किटेक्चर पदवीधारक असून त्यांना उद्योग आणि सामाजिक क्षेत्राचा दांडगा अनुभव आहे.

# विराट हिंदू संमेलन उत्साहात संपन्न

**धायरी (दै. आरंभ पर्व)**

चैत्र शुद्ध प्रतिपदेच्या मंगलमय निमित्ताने १९ मार्च २०२६ रोजी डीएसके विश्व, धायरी येथे आयोजित करण्यात आलेले विराट हिंदू संमेलन उत्साहात व भक्तीमय वातावरणात संपन्न झाले. या भव्य कार्यक्रमाला परिसरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. गुढीपाडव्याच्या पारंपरिक सणानिमित्त काढण्यात आलेली भव्य शोभायात्रा हे या संमेलनाचे मुख्य आकर्षण ठरले. पारंपरिक वेशभूषेत सजलेल्या महिलांनी, तसेच लहानांपासून ज्येष्ठांपर्यंत सर्वांनी भगवा ध्वज हातात घेत “जय श्रीराम”च्या घोषणांनी परिसर दुमदुमून सोडला. या शोभायात्रेमुळे संपूर्ण परिसरात उत्साहाचे आणि एकात्मतेचे वातावरण निर्माण झाले. कार्यक्रमाच्या पुढील सत्रात ‘राष्ट्र




वीर संघ’च्या विद्यार्थ्यांनी लाठीकाठी व दांडपट्टा यांसारख्या पारंपरिक युद्धकलेची प्रभावी प्रात्यक्षिके सादर करून उपस्थितांची दाद मिळवली. सांस्कृतिक कार्यक्रमात गीतगायन व भरतनाट्यम नृत्याच्या सादरीकरणांनी कार्यक्रमाला कलात्मक रंग चढवला. मुख्य कार्यक्रमात अध्यक्ष डॉ. सुजितजी निलेगांवकर, प्रमुख पाहुणे ह.भ.प. श्री राजेंद्र येप्रे महाराज, प्रमुख वक्ते श्री हेरंबजी कुलकर्णी तसेच सौ. शुभांगीताई देशपांडे यांनी उपस्थित राहून प्रेरणादायी विचार मांडले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे उपस्थितांना सामाजिक एकात्मता, संस्कृती जपणे आणि राष्ट्रभावना यांचे महत्त्व पटवून देण्यात

## धायरीत २२०० नागरिकांचा सहभाग

आले. या संमेलनाच्या निमित्ताने सामाजिक बांधिलकी जपत मोफत कॅल्शियम BMD व नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिराचा २८५ नागरिकांनी लाभ घेतला. कार्यक्रमाला आमदार श्री भीमरावअण्णा तापकीर, सौ. अश्विनी ताई पोकळे, श्री किशोरजी पोकळे, श्री दत्ताभाऊ कोल्हे, सौ. धनश्रीताई कोल्हे, श्री सचिनजी मोरे व सौ. जयश्रीताई भूमकर यांचीही उपस्थिती लाभली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन श्री प्रथमेश थिटे व डॉ. स्नेहल मानपुत्र यांनी प्रभावीपणे केले. “अखंड वंदे मातरम्”च्या घोषात कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. यानंतर उपस्थित नागरिकांनी महाप्रसादाचा लाभ घेत कार्यक्रमाचा आनंद द्विगुणित केला.

# बारामती पोटनिवडणुकीवर काँग्रेसचा दावा; राष्ट्रवादी न लढल्यास पूर्ण ताकदीने मैदानात

**वेल्हे (पुणे) (दै. आरंभ पर्व)**

बारामती विधानसभा मतदारसंघाच्या पोटनिवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महाविकास आघाडीत राजकीय हालचालींना वेग आला आहे. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार गट) या जागेवर निवडणूक लढवणार नसल्यास काँग्रेस पक्ष पूर्ण ताकदीने मैदानात उतरेल, असा महत्त्वपूर्ण निर्णय पुणे जिल्हा काँग्रेस कमिटीच्या बैठकीत घेण्यात आला आहे.

काँग्रेस भवन येथे जिल्हाध्यक्ष श्रीरंग चव्हाण-पाटील यांच्या



अध्यक्षतेखाली बारामती लोकसभा आणि विधानसभा मतदारसंघातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक पार पडली. या बैठकीत बारामती पोटनिवडणुकीसंदर्भातील रणनीतीवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

काँग्रेस नेते विजय वडेट्टीवार यांनी यापूर्वीच स्पष्ट भूमिका मांडत, राष्ट्रवादी काँग्रेसने दावा न केल्यास काँग्रेस निवडणूक लढवण्यास तयार असल्याचे सांगितले होते. त्याच भूमिकेला जिल्हा काँग्रेस कमिटीने अधिकृत पाठिंबा दर्शवला आहे.

बैठकीत कोल्हापूर उत्तरच्या पोटनिवडणुकीचा संदर्भ देत, भाजपने काँग्रेसविरोधात उमेदवार उभा केल्याची आठवण करून देण्यात आली. त्यामुळे “महाविकास आघाडीचा धर्म” पाळत काँग्रेसनेही बारामतीत आपली ताकद दाखवण्याची तयारी ठेवावी, असे मत व्यक्त करण्यात आले. यावेळी बारामती विधानसभा मतदारसंघ लढवण्याबाबतचा अधिकृत प्रस्ताव महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीकडे पाठवण्याचा निर्णयही एकमताने घेण्यात आला. बैठकीस काँग्रेसचे ज्येष्ठ नेते देविदास भन्साळी, कमलाकर सातव, गोविंद मिरघे, आकाश मोरे, रोहित बनकर, डॉ. विजय भिसे, राजेंद्र गायकवाड, धवल गाडे, रमेश जगदाळे यांच्यासह बारामती लोकसभा मतदारसंघातील सर्व तालुकाध्यक्ष आणि अनेक पदाधिकारी उपस्थित होते. या संदर्भात जिल्हाध्यक्ष श्रीरंग चव्हाण-पाटील यांनी स्पष्ट शब्दांत सांगितले, “पक्षश्रेष्ठींनी आदेश दिल्यास बारामती विधानसभा पोटनिवडणूक काँग्रेस पक्ष पूर्ण ताकदीने लढवण्यासाठी सज्ज आहे. आमचा प्रस्ताव प्रदेश नेतृत्वाकडे पाठवला आहे.” बारामती पोटनिवडणुकीच्या निमित्ताने महाविकास आघाडीत जागावाटपाबाबतची समीकरणे पुन्हा एकदा चर्चेत आली असून, येत्या काही दिवसांत या बाबत अंतिम निर्णय होण्याची शक्यता आहे.

# नागरिकांच्या प्रश्नांसाठी पदाचा योग्य वापर व्हावा – आ. भीमराव तापकीर

## नगरसेवक सचिन मोरे यांचा मित्र परिवाराकडून सत्कार

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लोकप्रतिनिधी म्हणून मिळालेले पद हे केवळ सन्मानासाठी नसून नागरिकांच्या प्रश्नांचे निराकरण करण्यासाठी वापरले गेले पाहिजे, असे प्रतिपादन आमदार भीमराव तापकीर यांनी केले. ते भाजपचे नव-निर्वाचित नगरसेवक सचिन मोरे यांच्या सत्कार समारंभात बोलत होते.

माणिकबाग येथील सिद्धार्थ हॉलमध्ये मित्रपरिवाराच्या वतीने आयोजित या कार्यक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी आमदार तापकीर म्हणाले की, नगरसेवक पदामुळे अपेक्षा वाढतात, मात्र त्या पूर्ण करण्यासाठी मित्रपरिवाराची साथ महत्त्वाची असते. आयुष्याच्या प्रत्येक टप्प्यावर मित्रांची साथ माणसाला बळ देते. मोरे यांना लाभलेला मोठा मित्रपरिवार ही त्यांची खरी ताकद असल्याचे त्यांनी नमूद केले.

यावेळी सत्काराला उत्तर देताना नगरसेवक सचिन मोरे यांनी आपल्या सर्वांचे सहकार्य असेच कायम राहावे, अशी अपेक्षा व्यक्त केली. प्रत्येक नागरिकासाठी सकारात्मक आणि ठोस काम करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त करत “मी सर्वांसाठी काहीतरी निश्चितपणे प्रयत्न करणार आहे,” असा विश्वास दिला. कार्यक्रमात सचिन बेनकर, सतीश जुनागडे, सचिन कुलकर्णी यांनी मनोगत व्यक्त करत मोरे यांच्या कार्यशैलीचे कौतुक केले. कार्यक्रमाला उपस्थित मान्यवर आणि मित्रपरिवाराने उत्साहपूर्ण वातावरण निर्माण केले. या कार्यक्रमाच्या



आयोजनात भाजप शहर ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष रमेशबापू गायकवाड, संदिप हगवणे, अमर शेळके, दिनेश चव्हाण, शरद गुरव, रणजीत जगताप, विनोद शिरतोढे, गोविंद मोरे, अनिल मते, किरण मते, प्रकाश शिंदे, गणेश माने, संजय हगवणे, शंकर साळुंखे, गणेश सणस, शशिकांत रणधीर, शिवाजी चावट, राजेश दणाणे, शहाजी वांजळे, दिपाली मते, मनिषा केमुसकर, निता मते, रविता भिलारे, वर्षा मते, शुभांगी बदिरगे, नलिनी शेलार, स्वाती पाटील यांचा सक्रिय सहभाग होता. एकंदरीतच, उत्साहपूर्ण वातावरणात पार पडलेल्या या सत्कार समारंभाने नगरसेवक सचिन मोरे यांच्या आगामी कार्यकाळाबाबत सकारात्मक अपेक्षा व्यक्त केल्या.

## थोडक्यात पण महत्वाचे



### सनी निम्हण यांच्या प्रयत्नातून औंध–डेक्कन बससेवा पुन्हा सुरू


**पुणे (आरंभ पर्व) :** पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल) तर्फे औंध ते डेक्कन जिमखाना दरम्यान धावणारी १०५ क्रमांकाची बससेवा पुन्हा सुरू करण्यात आली आहे. मागील काही महिन्यांपासून हा मार्ग बंद असल्याने औंध-बाणेर परिसरातील नागरिकांकडून सातत्याने सेवा सुरू करण्याची मागणी होत होती. नगरसेवक चंद्रशेखर उर्फ सनी निम्हण यांच्या पाठपुराव्यामुळे अखेर ही बससेवा पुन्हा सुरू झाली आहे. आज सकाळी सुमारे ८.१५ वाजता पहिल्या बसचे उद्घाटन मान्यवरांच्या उपस्थितीत करण्यात आले. यावेळी पीएमपीएमएलचे संचालक अजय खेडेकर, उपमहापौर परशुराम वाडेकर, नगरसेवक सनी निम्हण, नगरसेविका भक्ती गायकवाड, सपना छाजेड यांच्यासह आनंद छाजेड, शिरीष नाईकरे, रिपाई शिवाजीनगर युवक अध्यक्ष महादेव साळवे, मनोज दळवी, वसंत जुनावणे, निलेश गायकवाड, सुजाता पाटील, सूर्यकांत कळापुरे, सतीश तारू, मारुती पाटील, जॉन प्रकाश, मंगल जाधव, सुरेखा कुलकर्णी तसेच स्थानिक नागरिकआणि पीएमपीएमएल अधिकारी उपस्थित होते. डीपी रोड परिसरात अनेक वर्षांपासून बंद असलेली ही बससेवा पुन्हा सुरू झाल्याने नागरिकांनी समाधान व्यक्त केले. ही सेवा सकाळी ५.३० ते रात्री ८.१५ पर्यंत सुरू राहणार असून या मार्गावर दररोज आठ फेऱ्या होणार आहेत. त्यामुळे औंध-बाणेर ते डेक्कन परिसरातील प्रवास अधिक सोयीस्कर होणार असल्याची प्रतिक्रिया नागरिकांनी व्यक्त केली आहे.



### रिपब्लिकन पक्षाला राष्ट्रीय पक्ष मान्यता मिळवून देणार : रामदास आठवले

**पुणे (आरंभ पर्व) :** रिपब्लिकन पक्षाला सर्वसमावेशक स्वरूप प्राप्त करून देऊन राष्ट्रीय पक्ष म्हणून मान्यता मिळवून देण्याचा निर्धार आठवले गटाचे प्रमुख व केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी व्यक्त केला. पाच राज्यांमध्ये होणाऱ्या विधानसभा निवडणुकींपैकी चार राज्यात रिपब्लिकन पक्ष आपले उमेदवार उभे करणार असल्याचेही त्यांनी पत्रकार परिषदेत बोलताना सांगितले. यावेळी आरपीआय चे पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरोदे, जनरल सेक्रेटरी गौतम सोनवणे, सचिव बाळासाहेब जानराव, उपमहापौर परशुराम वाडेकर, चंद्रकांता सोनाकांबळे, सूर्यकांत वाघमारे, महिपाल वाघमारे, नीलेश अल्हाट, हिमाली कांबळे, निशा मानवतकर, बसवराज गायकवाड, विशाल शेवाळे, जयदेव रंधवे, नीलेश रोकडे, सचिन मानवतकर, विरेन साठे आदि पदाधिकारी, कार्यकर्ते उपस्थित होते. रिपब्लिकन पक्ष हा सर्व जाती धर्मांचा, समाजातील उपेक्षित वर्गाचा, तरुणांचा महिलांचा पक्ष असून त्याला सर्वसमावेशक स्वरूप देण्याचे कार्य हाती घेणार असल्याचे आठवले यांनी सांगितले. तामिळनाडू, आसाम, केरळ आणि पद्दूचेरी या राज्यात आपला पक्ष विधानसभा निवडणुकीत उमेदवार उभा करणार आहे, असेही ते म्हणाले.

### वेळेत निदानहीच टीबीवर मात करण्याची गुरुकिल्ली : डॉ. यन्नावार



**पुणे (आरंभ पर्व) :** जागतिक क्षयरोग दिनाच्या निमित्ताने मेडिकव्हर हॉस्पिटल्स, पुणे यांनी क्षयरोग (टीबी) या गंभीर संसर्गजन्य आजाराबाबत जनजागृती वाढवण्याचे आणि वेळेवर उपचार घेण्याचे आवाहन केले आहे. “वेळेत निदान, योग्य उपचार आणि प्रतिबंध हीच टीबीवर मात करण्याची त्रिसूत्री आहे,” असे प्रतिपादन फुफ्फुसरोग तज्ज्ञ डॉ. आनंद यन्नावार यांनी केले. टीबी हा प्रामुख्याने फुफ्फुसांवर परिणाम करणारा आजार असून तो संक्रमित व्यक्ती खोकताना किंवा शिंकताना हवेद्वारे पसरतो. हा आजार पूर्णपणे बरा होऊ शकतो, तरीही उशिरा निदान आणि अपूर्ण उपचारांमुळे त्याचा प्रसार वाढत असल्याचे तज्ज्ञांनी स्पष्ट केले. भारतात टीबीचा मोठा भार असल्यामुळे जनजागृती आणि वेळेवर वैद्यकीय उपचार अत्यंत महत्त्वाचे ठरतात.

दैनिक
# आरंभपर्व
आरंभ एका नव्या पर्वाचा
Epaper : www.aparv.com

• वर्ष : ०३ • अंक : १८५ • पुणे • मंगळवार, दि. २४ मार्च २०२६ • मराठी दैनिक • पाने ४ • किंमत : २ रूपये • RNI No.-MAHMAR/2023/89313

## ठळक बातम्या

### पती सासरी नांदायला येत नाही

पुणे (आरंभ पर्व) : लग्नानंतर काही दिवस सासरी राहून माहेरी निघून गेलेल्या पत्नीला पती सातत्याने नांदायला ये म्हणून सांगत होता. तिने नकार दिल्याच्या रागातून पतीने सोसायटीच्या आवारात उभ्या असलेल्या पत्नीच्या दुचाकीवर मध्यरात्री पेट्रोल टाकून जाळून टाकली. याप्रकरणी वारजे माळवाडी पोलिसांनी पतीला अटक केली आहे. राजकुमार इरन्ना सुतार (वय २७, रा. समर्थनगर, सिंहगड रोड) असे अटक केलेल्या पतीचे नाव आहे. याबाबत श्वेता विजय काटकर (वय २७, रा. सद्गुरू गॅलेक्सी अपार्टमेंट, दांगट इंडस्ट्रियल कमान, शिवणे) यांनी वारजे माळवाडी पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. ही घटना रविवारी (दि. २२) मध्यरात्री १ वाजून १७ मिनिटांनी घडली.

### पिंपरीत जनता सिलिंडरसाठी गॅसवर

पिंपरी (आरंभ पर्व) : घरपोच गॅस सिलिंडर ९६ तासांत देण्याचा जिल्हाधिकाऱ्यांचा आदेश फक्त कागदावरच दिसून येत आहे. गॅस वितरकांकडून या आदेशाला अक्षरशः केराची टोपली दाखवल्याचे चित्र समोर आले आहे. शहरात नागरिकांना चार दिवस तर सोडाच, दहा-पंधरा दिवस उलटूनही सिलिंडर मिळत नसल्याने तीव्र संताप व्यक्त होत आहे. विस्कळीत वितरण व्यवस्थेमुळे सर्वसामान्यांचे जगणे अक्षरशः विस्कळीत झाले आहे. प्रशासनाने तातडीने हस्तक्षेप करून वितरण सुरळीत करावे आणि दोषी एजन्सींवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांनी केली आहे. अन्यथा ९६ तासांत गॅस हा आदेश केवळ घोषणाबाजी ठरेल, असे म्हटले आहे.

### कठोर कारवाई करावी रामदास आठवले

पुणे (आरंभ पर्व) : राज्यात अनेक ठिकाणी भोंदूबाबा आणि अंधश्रद्धा पसरवणारे लोक सामान्य नागरिकांची फसवणूक करत आहेत. अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी सरकारने कडक पावले उचलली पाहिजेत. तसेच भोंदूबाबा कॅप्टन अशोक खरात याच्यावरही कठोर कारवाई करावी, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी रविवारी पुण्यात केले. पुण्यात 'आरपीआय'तर्फे आयोजित एका कार्यक्रमात ते बोलत होते. यावेळी आरपीआयचे पुणे शहर अध्यक्ष संजय सोनवणे, प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरोदे, जनरल सेक्रेटरी गौतम सोनवणे, सचिव बाळासाहेब जानराव, उपमहापौर परशुराम वाडेकर, चंद्रकांता सोनाकांबळे, सूर्यकांत वाघमारे, महिपाल वाघमारे, नगरसेवक नीलेश अल्हाट, हिमाली कांबळे, निशा मानवतकर, बसवराज गायकवाड, विशाल शेवाळे, जयदेव रंधवे, नीलेश रोकडे, सचिन मानवतकर, विरेन साठे आदी पदाधिकारी उपस्थित होते.

### पुणेकरांना नाहक भुर्दंड

पुणे (आरंभ पर्व) : उन्हाळ्याचा वाढता चटका आणि शाळांना सुट्टी लागल्यामुळे जलतरण तलावावर पोहण्यासाठी नागरिकांची गर्दी वाढण्यास सुरुवात झाली आहे. पण पुणे महापालिकेच्या ३५ पैकी ११ जलतरण तलाव विविध कारणांमुळे बंद आहेत. त्यातच पालिकेच्या सुरू असलेल्या अनेक जलतरण तलावांवर चालकांची मनमानी सुरू असून, निर्धारित शुल्कापेक्षा अधिक शुल्क आकारले जात आहे. काही ठिकाणी निर्धारित शुल्कापेक्षा दुप्पट, तर काही ठिकाणी तिप्पट शुल्क आकारण्यात येत असून, त्याचा नाहक भुर्दंड पुणेकरांना सहन करावा लागत आहे.

# लैंगिक संबंधांसाठी अशोक खरात जोड्या जुळवायचा

## हाच भोंदू बाबा होता रूपाली चाकणकरांचा गुरू

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

महिलांवर अत्याचार केल्याप्रकरणी स्वयंघोषित ज्योतिषी कॅप्टन अशोक खरात याच्यावर गुन्हा दाखल झाल्यानंतर राज्यात एकच खळबळ उडाली आहे. राज्यातील अनेक मंत्री, बडे अधिकारी, राजकीय नेते, सेलिब्रिटी या भोंदूबाबा अशोक खरातचे भक्त होते. अशोक खरात नाशिकच्या मीरपूर येथील ईशानेश्वर मंदिराच्या मागील बाजूस असलेल्या घनदाट जंगलात भक्तांना पूजेसाठी बोलावायचा. त्या ठिकाणी भक्तांना घाबरवून आणि अघोरी कृत्ये करुन खरात त्यांच्याकडून पैसे वसूल करायचा, अशीही



माहिती समोर आली आहे. अशोक खरात स्वतः महिलांचे लैंगिक शोषण करतच होता. पण अशोक खरात त्याच्याकडे येणाऱ्या महिला-पुरुषांच्याही लैंगिक संबंधांसाठी जोड्या जुळवत होता. याआधारे अशोक खरातने काही बड्या लोकांना ब्लॅकमेल केले असल्याची माहितीही पोलीस सूत्रांकडे आहे. अशोक खरात पहिले महिलांचे लैंगिक शोषण

## स्वत: लैंगिक शोषण केल्यानंतर काय काय करायचा?


करुन नंतर यातील पीडित व इतर काही महिलांचाही धनिक पुरुषांसोबत लैंगिक संबंध ठेवण्यासाठी वापर करत होता, अशी हादरवणारी माहितीही समोर आली आहे. अशोक खरात याला आज नाशिकच्या जिल्हा न्यायालयात हजर केले जाणार आहे. अशोक खरात याच्या पोलीस कोठडीची मुदत आज संपत असल्यानं त्याला आज न्यायालयात हजर केले जाणार आहे. अशोक खरात याच्या विरोधात एकूण 6 फौजदारी गुन्हे दाखल करण्यात आले असून काल 3 महिलांनी गुन्हा दाखल केल्याची माहिती एसआयटी ने दिली आहे. तक्रार करणाऱ्या तिन्ही महिला असून अशोक खरातने त्यांच्यावरही अत्याचार केल्याची महिलांची तक्रार आहे. इतर तक्रारी प्रमाणेच पॅटर्न राबवित कुटूंबियांना केबिन च्या बाहेर काढून महिलांचे शोषण करत असल्याचे समोर आले आहे. आतापर्यंत 6 तक्रारी दाखल असून यात 5 महिलांनी आणि एका पुरुषाने फिर्याद दिली आहे, आतापर्यंत च्या तपासात काय निष्पन्न झाले याबाबतीत पोलिसांकडून न्यायालयात माहिती दिली जाणार असून पुढील तपासासाठी पोलीस कोठडीची मागणी केली जाणार आहे. भोंदूबाबा अशोक खरात याची शिर्डीत कोट्यावधींची मालमत्ता असल्याचं समोर आल्यानंतर आता त्याची काही उद्योग व्यवसायातही भागीदारी असल्याचं आता समोर आलं आहे. शिर्डीतील वॉटरपार्क शेजारी निमगाव शिवारात असणाऱ्या कोट्यावधीच्या मालमत्तेत हा भोंदूबाबा भागीदार आहे. 48 गुंठे परीसरात असणाऱ्या सिल्वर ओक या लॉन्समध्ये तो भागीदार आहे. शिवनिका ट्रस्टचे उपाध्यक्ष जितेंद्र शेळके यांचे बंधू महेंद्र शेळके यांच्या लॉन्समध्ये गुंतवणूक या भोंदूबाबाने केली आहे. शिर्डीत अनेक मालमत्ता असल्याची चर्चा असून या मालमत्ता त्याने कशा मिळवल्या याचीही चौकशी होणं गरजेचं आहे.















# स्वप्नांना पंख देणारे प्रेरणादायी व्यक्तिमत्त्व
# प्रतिक गंगणे सर

## वाढदिवस अभिष्टचिंतन विशेष
### मा. श्री. लक्ष्मण साबळे



**(दै. आरंभ पर्व)**

धाराशिव जिल्ह्यातील तुळजापूर तालुक्यातील जळकोट या छोट्याशा गावातून पुण्यासारख्या मोठ्या शहरात येऊन माध्यम क्षेत्रात स्वतःची ठळक ओळख निर्माण करणे ही सहज गोष्ट नाही. परंतु जिद्द, मेहनत आणि प्रामाणिकपणाच्या जोरावर प्रतिक गंगणे सरांनी हा प्रवास यशस्वीपणे पूर्ण केला आणि आज ते माध्यम क्षेत्रातील एक विश्वासार्ह नाव बनले आहेत.

प्रतिक सरांनी आपल्या पत्रकारितेच्या प्रवासाची सुरुवात एक युवा पत्रकार म्हणून केली. सुरुवातीपासूनच त्यांनी समाजातील प्रश्नांवर निर्भीडपणे भाष्य करत पत्रकारितेचा मूलभूत हेतू जपला. "पुणे प्रहार" या डिजिटल पोर्टलच्या माध्यमातून त्यांनी सामाजिक प्रबोधनाचे कार्य हाती घेत अनेक महत्त्वाचे विषय लोकांसमोर आणले. त्यांच्या लेखणीमध्ये नेहमीच समाजहिताची जाणीव आणि सत्य मांडण्याची ताकद दिसून येते.

यानंतर त्यांनी मा. सौ. सुरेखा मते मॅडम यांच्या सहकार्याने "दैनिक आरंभ पर्व" या दैनिकाची स्थापना केली. या दैनिकाच्या माध्यमातून त्यांनी अनेक नवोदित पत्रकारांना व्यासपीठ उपलब्ध करून दिले. आज दैनिक आरंभ पर्व विशेषतः दक्षिण पुण्यात वेगाने लोकप्रिय होत असून, समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचे काम प्रभावीपणे करत आहे. या यशामागे प्रतिक सरांची दूरदृष्टी, नेतृत्वगुण आणि सातत्यपूर्ण परिश्रम स्पष्टपणे जाणवतात.

प्रतिक गंगणे सरांचे व्यक्तिमत्त्व हे केवळ संपादक या पदापुरते मर्यादित नाही. ते एक मार्गदर्शक, प्रेरणास्थान आणि प्रत्येकाला संधी देणारे नेतृत्व आहे. त्यांचा शांत, संयमी आणि समजूतदार स्वभाव प्रत्येकाला आपलेसा वाटतो. एवढ्या मोठ्या जबाबदाऱ्या सांभाळताना देखील ते सहकाऱ्यांशी स्नेहाने वागतात आणि आवश्यक ते मार्गदर्शन अत्यंत नम्रतेने करतात, ही त्यांची मोठी जमेची बाजू आहे. माझ्या आयुष्यातही त्यांचे योगदान अत्यंत मोलाचे आहे. मीही पत्रकार बनण्याचे एक छोटे स्वप्न मनात जपले होते; मात्र त्या स्वप्नांना प्रत्यक्षात उतरवण्याचे काम प्रतिक सरांनी केले. संघर्षमय परिस्थितीत त्यांनी दिलेली साथ, मार्गदर्शन आणि माझ्यावर दाखवलेला विश्वास हीच माझी खरी ताकद ठरली. आज मी घेत असलेल्या प्रत्येक भरारीत त्यांचा सिंहाचा वाटा आहे, हे मी अभिमानाने सांगू शकतो.

> **सरांनी दिलेल्या प्रत्येक संधीचे सोने करण्याचा माझा प्रामाणिक प्रयत्न कायम राहील, हा विश्वास मी व्यक्त करतो. त्यांच्या मार्गदर्शनाखाली काम करण्याची संधी मिळणे ही माझ्यासाठी अभिमानाची आणि प्रेरणादायी गोष्ट आहे.**

मला प्रतिक गंगणे सरांना यशाच्या सर्वोच्च शिखरावर पाहायचे आहे. त्यांच्या यशस्वी प्रवासात एक छोटीशी पायरी होण्याचा मान मला नेहमीप्रमाणे मिळत राहो, हीच मनापासून इच्छा आहे. त्यांच्या कार्यातून भविष्यातही समाजाभिमुख पत्रकारितेला नवी दिशा मिळत राहील, यात शंका नाही.

प्रतिक गंगणे सर हे केवळ एक नाव नाही, तर अनेकांच्या स्वप्नांना पंख देणारी, त्यांना उंच भरारी घेण्यास प्रेरणा देणारी एक सशक्त शक्ती आहे.

सर आपणास पुन्हा वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा आपल्या सर्व इच्छा आकांक्षा पूर्ण व्हावेत ही सदिच्छा...!

# मिरगावात तृप्ती देसाईंचा धडक दौरा
*अशोक खरात प्रकरणात मोठे गौप्यस्फोट होण्याची शक्यता*



**नाशिक (दै. आरंभ पर्व)**

भोंदू बाबा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या अशोक खरात प्रकरणाने राज्यभरात खळबळ उडवली असताना, या प्रकरणाला आता नवे वळण मिळाले आहे. सामाजिक कार्यकर्त्या तृप्ती देसाई यांनी थेट मिरगाव येथे धडक देत या प्रकरणातील सत्य बाहेर आणण्याचा निर्धार व्यक्त केला आहे. आज त्या खरातच्या मिरगाव येथील फार्महाऊससह ईशान्यश्वर मंदिरातील कथित 'काळोखी खोली'ची प्रत्यक्ष पाहणी करणार असून, यानंतर अनेक धक्कादायक बाबी उघड होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. अशोक खरातवर महिलांचे लैंगिक शोषण, जमीन बळकावणे आणि गुन्हेगारी रॅकेट चालवण्याचे गंभीर आरोप करण्यात आले आहेत. तृप्ती देसाई यांनी दावा केला आहे की, ईशान्यश्वर मंदिरात एक बंद, अंधारी खोली होती, जिचा वापर महिलांच्या शोषणासाठी केला जात असे. या खोलीची पाहणी करून त्यामागील सत्य जनतेसमोर आणण्याचा त्यांचा प्रयत्न असणार आहे. देसाई यांनी सांगितले की, मिरगाव परिसरातील नागरिक प्रचंड भीतीच्या वातावरणात जगत होते. "खरातच्या विरोधात बोलण्याची कोणाचीही हिंमत नव्हती. मात्र आता अनेकांनी मला संपर्क करून मदतीची विनंती केली आहे. त्यामुळे मी स्वतः त्या ठिकाणी जाऊन पाहणी करणार आहे," असे त्यांनी स्पष्ट केले. दरम्यान, अशोक खरात केवळ महिलांचे शोषण करत नव्हता, तर त्याने जमीन बळकावण्याचे मोठे जाळे उभे केले होते, असा आरोपही देसाई यांनी केला आहे. विरोध करणाऱ्यांना धमक्या देणे, काहींना बेपत्ता करणे आणि हत्येचाही संशय असल्याचे गंभीर दावे करण्यात आले आहेत. तसेच, १२ मार्च २०२६ रोजी तो ऑस्ट्रेलियाला पळून जाण्याच्या तयारीत होता, अशी माहितीही समोर आली आहे. या प्रकरणाला आता राजकीय रंगही चढू लागला आहे. तृप्ती देसाई यांनी राष्ट्रवादी काँग्रेसच्या नेत्या रुपाली चाकणकर आणि रुपाली पाटील यांच्यावर जोरदार टीका केली आहे. महिला आयोगाच्या अध्यक्षा रुपाली चाकणकर यांनी राजीनामा द्यावा, अशी मागणी त्यांनी केली असून, रुपाली पाटील यांच्याबाबतही त्यांनी नाराजी व्यक्त केली आहे. पुढील काही दिवसांत त्या सुनेत्रा पवार यांची भेट घेऊन या प्रकरणी भूमिका मांडणार असल्याचेही त्यांनी जाहीर केले आहे.

> **तृप्ती देसाईंच्या या दौऱ्यानंतर प्रकरणातील अनेक धक्कादायक गोष्टी उघडकीस येण्याची शक्यता आहे. त्यामुळे या प्रकरणाकडे केवळ नाशिकच नव्हे, तर संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे.**




## थोडक्यात पण महत्वाचे



### डिजिटल माध्यमांवरील बंदीविरोधात महापालिकेबाहेर निषेध आंदोलन

पुणे (आरंभ पर्व) : पुणे महानगरपालिकेच्या मुख्य सभेचे वार्तांकन डिजिटल माध्यमांना करण्यास बंदी घालण्याच्या निर्णयाविरोधात आज तीव्र निषेध नोंदवण्यात आला.श्री छत्रपती शिवाजी महाराज सभागृह बाहेर ज्येष्ठ पत्रकार शरद लोणकर यांनी ठिय्या आंदोलन करत निर्णयाचा निषेध व्यक्त केला. या आंदोलनाला पुणे मराठी पत्रकार संघच्या वतीने पाठिंबा देण्यात आला. संघाचे अध्यक्ष धनराज गरड यांनी महापौर मंजुषा नागपुरे यांना निवेदन सादर करून हा निर्णय तात्काळ मागे घेण्याची मागणी केली. निवेदनात नमूद करण्यात आले की, पारंपरिक माध्यमांना परवानगी देऊन डिजिटल माध्यमांना नकार देणे हा दुहेरी निकष असून तो अभिव्यक्ती स्वातंत्र्य आणि माहितीच्या समान हक्कावर परिणाम करणारा आहे. आजच्या काळात डिजिटल मीडिया हे नागरिकांपर्यंत जलद, पारदर्शक आणि थेट माहिती पोहोचवणारे प्रभावी माध्यम बनले आहे. महापालिकेच्या मुख्य सभेतील कामकाज जनतेपर्यंत व्यापक स्वरूपात पोहोचावे, यासाठी डिजिटल माध्यमांनाही समान संधी द्यावी, अशी मागणी आंदोलकांनी केली. निर्णयाचा पुनर्विचार न झाल्यास पुढील काळात आंदोलन तीव्र करण्याचा इशाराही यावेळी देण्यात आला. यावेळी पुणे मराठी पत्रकार संघाचे पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### धनुष पुन्हा घाटांवर; 'तेरे इश्क में'चा वर्ल्ड टीव्ही प्रीमियर २७ मार्चला




मुंबई (आरंभ पर्व) : हिंदी चित्रपटसृष्टीतील बहुप्रतीक्षित भावनिक चित्रपट 'तेरे इश्क में'चा भव्य वर्ल्ड टेलिव्हिजन प्रीमियर येत्या २७ मार्च रोजी रात्री ८ वाजता सोनी मॅक्सवर होणार आहे. 'रांझना' या गाजलेल्या चित्रपटानंतर तब्बल बारा वर्षांनी अभिनेता धनुष आणि दिग्दर्शक आनंद एल. राय ही जोडी पुन्हा एकत्र येत प्रेक्षकांना वाराणसीच्या घाटांवरच्या भावविश्वात घेऊन जाणार आहे. 'तेरे इश्क में'ला 'रांझना'चा आध्यात्मिक वारसदार मानले जात असून, या चित्रपटात धनुष 'शंकर'च्या भूमिकेत अधिक गडद आणि गुंतागुंतीचे पात्र साकारताना दिसतो. प्रेम, वेड आणि त्याची किंमत या भावनांचा तीव्र अनुभव या कथेतून मांडण्यात आला आहे. गंगेच्या काठावर धोतीमधील धनुषचा लूक प्रेक्षकांसाठी खास आकर्षण ठरत आहे. या चित्रपटात अभिनेत्री कृती सॅनॉननेही प्रभावी भूमिका साकारली असून, तिच्या अभिनयाने कथेला अधिक खोली प्राप्त झाली आहे. दिग्दर्शक आनंद एल. राय यांनी छोट्या शहरातील वास्तववादी वातावरण जिवंत केले असून, संगीतकार ए. आर. रहमान यांच्या संगीताने कथानकाला वेगळी उंची दिली आहे.

# विवो Y51 प्रो 5G लॉँच

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

स्मार्टफोन बाजारात आपली Y-सिरीज अधिक मजबूत करत विवोने विवो Y51 प्रो 5G हा नवा स्मार्टफोन लॉँच केला आहे. स्टायलिश डिझाइनसोबत दमदार परफॉर्मन्स, दीर्घ बॅटरी लाईफ आणि स्मार्ट फीचर्स यांचा समतोल साधणारे हे डिव्हाइस विशेषतः दैनंदिन वापर आणि दीर्घकालीन पॉवरची गरज असलेल्या वापरकर्त्यांसाठी डिझाइन करण्यात आले आहे. या स्मार्टफोनमध्ये मीडियाटेक डायमेन्सिटी 7360 टर्बो चिपसेट देण्यात आला असून, तो मल्टीटास्किंग, गेमिंग आणि मनोरंजनासाठी सुरळीत आणि जलद परफॉर्मन्स प्रदान करतो. ९.२ लाखांहून अधिक AnTuTu स्कोअरसह हा फोन प्रतिसादक्षम अनुभव देतो. 8GB पर्यंत रॅम, एक्सटेंडेड रॅम सपोर्ट आणि 128GB/256GB स्टोरेजमुळे

- **दीर्घ बॅटरी लाईफ आणि AI फीचर्समुळे वापरकर्त्यांसाठी नवा पर्याय**




ॲप्समध्ये सहज स्विचिंग आणि स्थिर परफॉर्मन्स मिळतो. या फोनचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ७२००mAh ची मोठी बॅटरी, जी ४४W फ्लॅशचार्जसह येते. त्यामुळे एकदा चार्ज केल्यानंतर फोन आरामात पूर्ण दिवस, तसेच हलक्या वापरात दोन दिवस टिकतो. बॅटरी हेल्थ मॅनेजमेंट टेक्नॉलॉजीमुळे दीर्घकाळ चांगली कार्यक्षमता राखली जाते. तसेच रिव्हर्स चार्जिंगमुळे इतर डिव्हाइसही चार्ज करता येतात.

# 'बचपना शुडन्ट रिटायर' मोहिमेची सुरुवात; ज्येष्ठांच्या आरोग्यासाठी राष्ट्रीय हाक
*एमएस धोनीचा वापी येथे प्रेरणादायी संवाद, 'ट्रीटमेंट जरुरी है' उपक्रमाला बळ*

**वापी (दै. आरंभ पर्व)**

मेरिलच्या वापी येथील जागतिक मुख्यालयात भारताचा माजी क्रिकेट कर्णधार एमएस धोनी याच्या उपस्थितीत 'बचपना शुडन्ट रिटायर' या मोहिमेची प्रभावी सुरुवात झाली. ज्येष्ठ नागरिकांच्या आरोग्य, सन्मान आणि आनंदी जीवनशैलीसाठी ही राष्ट्रीय पातळीवरील चळवळ असून, ती 'ट्रीटमेंट जरुरी है' या सार्वजनिक आरोग्य मोहिमेचा विस्तार आहे.

या उपक्रमाचा मुख्य उद्देश म्हणजे वृद्धत्वाकडे पाहण्याची पारंपरिक दृष्टी बदलणे आणि ज्येष्ठांना सक्रिय, निरोगी आणि आनंदी जीवन जगण्यासाठी प्रोत्साहित करणे हा आहे. लवकर निदान, नियमित तपासण्या आणि प्रगत उपचारांच्या माध्यमातून हृदयविकार, हाडांचे विकार आणि इतर वयोमानाशी संबंधित आजारांवर



प्रभावी नियंत्रण मिळवता येते, असा संदेश या मोहिमेतून दिला जात आहे.

कार्यक्रमादरम्यान एमएस धोनी यांनी उपस्थितांशी संवाद साधत आरोग्याबाबत जागरूकतेचे महत्त्व अधोरेखित केले. "आपल्या आरोग्याची काळजी घेणे ही सर्वात महत्त्वाची जबाबदारी आहे. विशेषतः तरुण पिढीने आपल्या पालकांना आणि आजी-आजोबांना योग्य काळजी व आधार मिळेल याची खात्री करणे गरजेचे आहे," असे त्यांनी सांगितले. त्यांनी या मोहिमेचा भाग असल्याचा आनंद व्यक्त करत, समाजातील प्रत्येक घटकाने यात सहभागी व्हावे, असे आवाहन केले.

'बचपना शुडन्ट रिटायर' ही केवळ आरोग्य मोहीम नसून एक भावनिक आणि सामाजिक उपक्रम आहे. यामध्ये कुटुंबातील सदस्यांनी आपल्या ज्येष्ठांसोबत वेळ घालवावा, त्यांच्यासोबत खेळ, छंद आणि आठवणी शेअर कराव्यात, यावर भर देण्यात आला आहे. भावनिक नातेसंबंध आणि शारीरिक आरोग्य यांचा एकत्रित विचार या मोहिमेचा गाभा आहे. भारतात वाढत्या जीवनशैलीजन्य आजारांच्या पार्श्वभूमीवर या उपक्रमाचे महत्त्व अधिक अधोरेखित होते. संशोधनानुसार देशातील जवळपास २८ टक्के मृत्यू हे हृदयविकारांमुळे होतात, तर २४ टक्क्यांहून अधिक प्रौढ व्यक्ती लठ्ठपणाच्या समस्येला सामोरे जात आहेत. याशिवाय, प्रत्येक चारपैकी एक व्यक्ती गुडघ्याच्या संधिवाताने त्रस्त असल्याचेही अभ्यासातून समोर आले आहे. त्यामुळे प्रतिबंधात्मक तपासणी आणि वेळेवर उपचार यांची गरज अधिक वाढली आहे. ही मोहीम प्रिंट, टेलिव्हिजन, रेडिओ आणि डिजिटल माध्यमांतून देशभर राबवली जाणार आहे. सोशल मीडियाच्या माध्यमातून नागरिकांनी आपल्या आजी-आजोबांसोबतच्या आठवणी शेअर करून या चळवळीत सहभागी व्हावे, असे आवाहन करण्यात आले आहे. एकूणच, 'बचपना शुडन्ट रिटायर' ही मोहीम वृद्धत्वाला नवे परिमाण देत ज्येष्ठांच्या सन्मानासोबत त्यांच्या आरोग्यपूर्ण आणि आनंदी आयुष्याची दिशा ठरवणारी ठरत आहे.






## थोडक्यात पण महत्त्वाचे



### खडकवासला गॅस संकट उग्र; सिलेंडरसाठी पहाटेपासून रांगा

खडकवासला (आरंभ पर्व) : खडकवासला परिसरात गॅस टंचाईने भीषण स्वरूप धारण केले असून, सर्वसामान्य नागरिकांचे दैनंदिन जीवन अक्षरशः विस्कळीत झाले आहे. गॅस सिलेंडरसाठी नागरिकांना पहाटेपासूनच एजन्सीबाहेर रांगा लावाव्या लागत आहेत, तर अनेकांना दिवसभर थांबूनही रिकाम्या हाताने परतावे लागत आहे. विशेषतः हातावर पोट असणारे कामगार आणि स्थलांतरित कुटुंबे या परिस्थितीत सर्वाधिक भरडली जात आहेत. रोजंदारी सोडून रांगेत उभे राहणे भाग पडत असल्याने त्यांच्या उपजीविकेवर थेट परिणाम होत आहे. "काम करायचं की गॅस मिळवायचा?" असा प्रश्न त्यांच्या समोर उभा ठाकला आहे. दरम्यान, गॅस टंचाईचा गैरफायदा घेत काही ठिकाणी काळाबाजार जोरात सुरू असल्याच्या तक्रारी समोर येत आहेत. अधिक दराने सिलेंडर विक्री होत असल्याने सामान्य नागरिकांच्या खिशाला मोठा फटका बसत आहे. परिस्थिती दिवसेंदिवस गंभीर होत असताना प्रशासन मात्र निष्क्रिय असल्याची भावना नागरिकांमध्ये वाढत आहे. गॅस पुरवठा तातडीने सुरळीत करावा, दोषींवर कडक कारवाई करावी आणि नागरिकांना दिलासा द्यावा, अशी जोरदार मागणी आता होत आहे.

### सह्याद्रीची ओरबाड; बेकायदेशीर प्लॉटिंगमुळे डोंगररांगांचा ऱ्हास

वेल्हे (आरंभ पर्व) : राजगड तालुक्यातील सह्याद्रीच्या डोंगररांगांमध्ये सुरू असलेल्या बेकायदेशीर प्लॉटिंगमुळे पर्यावरणाचा मोठ्या प्रमाणावर ऱ्हास होत असल्याचे चित्र स्पष्ट होत आहे. डोंगर कापून रस्ते तयार करणे, मातीचे उत्खनन आणि झाडांची अंधाधुंद तोड यामुळे परिसरातील नैसर्गिक संतुलन बिघडले आहे. स्थानिकांच्या म्हणण्यानुसार, अनेक ठिकाणी डोंगर पोखरून सपाट करण्यात येत असून प्लॉटिंगसाठी जमिनी तयार केल्या जात आहेत. यामुळे पावसाळ्यात दरडी कोसळण्याचा धोका वाढला असून, भविष्यात मोठ्या आपत्तीची शक्यता निर्माण झाली आहे. वन्यजीवांचे अधिवास नष्ट होत असून पाण्याचे नैसर्गिक स्रोतही आटत चालले आहेत. परिणामी, परिसरातील जैवविविधतेवर गंभीर परिणाम होत आहे. दरम्यान, या प्रकाराकडे प्रशासनाचे दुर्लक्ष होत असल्याची भावना नागरिकांमध्ये व्यक्त होत आहे. संबंधित विभागांकडून ठोस कारवाई होत नसल्याने बेकायदेशीर कामांना प्रोत्साहन मिळत असल्याचा आरोप होत आहे. राजगड परिसर हा ऐतिहासिकदृष्ट्या संवेदनशील मानला जातो. मात्र, वाढत्या अतिक्रमणामुळे या वारशालाही धोका निर्माण झाला आहे. परिसरातील नागरिकांनी तातडीने बेकायदेशीर प्लॉटिंगवर बंदी घालून डोंगररांगांचे संरक्षण करावे, अशी मागणी केली आहे.

### पुणे कॉमिक कॉनमध्ये चाहत्यांच्या उत्साहाला उधाण, अनोखी पर्वणी



पुणे (आरंभ पर्व) : मारुती सुझुकी अॅरेना प्रस्तुत आणि क्रंचीरोलचे पाठबळ असलेल्या बहुप्रतिक्षित पुणे कॉमिक कॉन २०२६ चा पहिला दिवस शनिवारी मेफिल्ड यश गार्डन येथे मोठ्या उत्साहात सुरू झाला. वीकेंडच्या निमित्ताने २१ आणि २२ मार्च रोजी रोजी आयोजित करण्यात आलेल्या या कार्यक्रमाच्या उद्घाटन दिवशी प्रचंड गर्दी झाली. कॉमिक्स, अॅनिमे, गेमिंग आणि पॉप कल्चरशी संबंधित सर्व गोष्टींचा आनंद साजरा करण्यासाठी चाहत्यांनी कार्यक्रमस्थळी गर्दी केली. त्यातून एका अविस्मरणीय वीकेंडची सुरुवात झाली. कार्यक्रमाच्या उद्घाटनाच्या दिवशी चाहत्यांनी विशेष अशा "क्रिएटर्स अक्रॉस बॉर्डर्स" या सेगमेंटमध्ये जागतिक कॉमिक क्रिएटर जोश ब्लेलॉक यांच्याशी उत्साहाने संवाद साधला. भारतीय क्रिएटर्सच्या सत्रांमध्ये, तसेच पुणे अॅनिमे कम्युनिटीने आयोजित केलेल्या संवादात्मक सत्रांमध्येही चाहत्यांचा मोठा सहभाग दिसून आला. कॉमिक कॉनमध्ये पहिल्या दिवशी मनोरंजन आणि प्रतिभेने संपन्न असे दमदार कार्यक्रम सादर झाले. यात स्टँड-अप कॉमेडियन सिद्धार्थ शेट्टीने आपल्या मार्मिक निरीक्षणात्मक विनोदाने आणि मंचावरील सहज वावराने प्रेक्षकांना खळखळून हसवले. कुमार वरुण याने 'क्विझिंग विथ केव्ही' या कार्यक्रमात आपल्या खास विनोदबुद्धीने सामान्य ज्ञान, विनोद आणि प्रेक्षकांशी उत्साही संवाद यांचा एक ऊर्जापूर्ण मिलाफ सादर केला.

### पेप्सिको इंडियाचा जलसंधारणात मोठा वाटा; हजारो ग्रामस्थांना लाभ




नवी दिल्ली (आरंभ पर्व) : जागतिक जल दिनानिमित्त पेप्सिको इंडियाने जलसंधारण क्षेत्रातील आपली भक्कम कामगिरी अधोरेखित करत २०२५ मध्ये तब्बल १४८ कोटी लिटर पाणी निसर्गाला परत दिल्याची घोषणा केली आहे. कंपनीने 'पार्टनरशिप ऑफ प्रोग्रेस' या संकल्पनेतून पाणी संवर्धन, भूजल पुनर्भरण आणि स्वच्छ पाणी उपलब्धतेवर लक्ष केंद्रित केले असून, विविध सामाजिक उपक्रमांद्वारे जलसुरक्षेला चालना दिली आहे. पेप्सिकोचा 'सस्टेनेबल वॉटर रिसोर्स डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट' (SWRDM) कार्यक्रम पंजाब, महाराष्ट्र (पुणे) आणि उत्तर प्रदेशमध्ये राबवला जात असून, पाणलोट क्षेत्र विकास आणि पावसाचे पाणी साठवण यावर भर दिला जात आहे. या उपक्रमांमुळे ८९ हजारांहून अधिक ग्रामस्थांना लाभ झाला असून, जलस्रोत उपलब्धता, शाश्वत शेती आणि हवामान बदलांना तोंड देण्यासाठी मदत झाली आहे. कंपनीने 'सेफ वॉटर ॲक्सेस अँड वॉश' उपक्रमांतर्गत ग्रामीण भागात स्वच्छ पाणी आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करून दिल्या आहेत. मथुरामधील यशानंतर हा कार्यक्रम ३० गावांतील १ लाख नागरिकांपर्यंत विस्तारला जाणार आहे.

## खडकवासला शेतकरी विकास संस्थेवर राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत

# 'भैरवनाथ पॅनेल'चा झेंडा





### संदीप पाटीलबुवा मते यांच्या नेतृत्वाखाली पंचवार्षिक निवडणुकीत दणदणीत विजय



खडकवासला (दै. आरंभ पर्व)

खडकवासला येथील यशवंत शेतकरी विकास सेवा सोसायटी संस्थेच्या २०२६ ते २०३१ या कालावधीसाठी झालेल्या पंचवार्षिक निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेस पुरस्कृत 'श्री भैरवनाथ शेतकरी ग्राम परिवर्तन पॅनेल'ने एकहाती विजय मिळवत संस्थेवर आपला झेंडा फडकवला आहे. व भाजप पुरस्कृत पॅनेलचा मोठा पराभव केला. अनेक वर्षांपासून बिनविरोध होणाऱ्या या निवडणुकीत यंदा थेट लढत झाली, मात्र भैरवनाथ पॅनेलने आपले वर्चस्व सिद्ध करत १२ पैकी तब्बल ११ जागांवर विजय मिळवला.या निवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते ,माजी उपसरपंच संदीप पाटीलबुवा मते यांच्या नेतृत्वाखालील पॅनेलचे विलास तुकाराम मते (९४), सुरेश तुकाराम मते (९३), सुनिता दिलीप मते (९२), जयनाथ कालिदास मते (९१), अनिल मारुती मते (८९), अमित अंकुश रणधीर (८९), सुमित खंडू मते (८८), विकास अरुण रायकर (८७), शांताराम साधू मते (८४), चंद्रशेखर साधू मते (८४) आणि लक्ष्मीबाई पांडुरंग मते (८४) हे उमेदवार विजयी झाले. विरोधी भाजप पुरस्कृत पॅनेलमधून अशोक मते (७४) हे एकमेव उमेदवार विजयी झाले असून, त्यांच्या इतर सर्व उमेदवारांना पराभवाचा सामना करावा लागला.

विशेष म्हणजे, अनेक वर्षांची बिनविरोध निवडणुकीची परंपरा यंदा खंडित झाली होती. तरीही भैरवनाथ पॅनेलने एकतर्फी विजय मिळवत सभासदांचा ठाम विश्वास संपादन केला आहे. या विजयामुळे परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले असून समर्थकांनी फटाके फोडून जल्लोष साजरा केला. विजयानंतर बोलताना पॅनेल प्रमुख संदीप पाटीलबुवा मते यांनी सभासदांचे आभार मानत सांगितले की, "संस्थेच्या माध्यमातून शेतकऱ्यांच्या हितासाठी ठोस निर्णय घेतले जातील. ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना अधिक सक्षम करण्यासाठी प्रामाणिक प्रयत्न करू." निवडून आलेल्या सर्व सदस्यांनीही संस्थेचा कारभार पारदर्शक, विश्वासार्ह आणि शेतकरीहिताला प्राधान्य देणारा ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला. दरम्यान, या विजयानंतर खडकवासला गावात भैरवनाथ पॅनेलच्या समर्थकांनी विजयी पदयात्रा काढली. या पदयात्रेची सांगता श्री काळभैरवनाथ मंदिर येथे करण्यात आली.

## परभणीतून वर्षभरापूर्वी बेपत्ता झालेली मुलगी पुण्यात सापडली

### पोलिस आणि मिसिंग ग्रुपच्या प्रयत्नांमुळे मुलगी सुखरूप ताब्यात



पुणे/परभणी (दै. आरंभ पर्व)

परभणी जिल्ह्यातून वर्षभरापूर्वी बेपत्ता झालेली १५ वर्षीय मुलगी अखेर पुण्यातून सुखरूप ताब्यात घेण्यात आली असून, पोलिस आणि सामाजिक संघटनांच्या समन्वयातून ही मोठी यशस्वी कारवाई पार पडली आहे.

वंदना देविदास साळवे (वय १५) ही मुलगी १० एप्रिल २०२५ रोजी दुपारी साडेबारा वाजण्याच्या सुमारास परभणी जिल्ह्यातील काष्टागाव येथून कोणालाही न सांगता घरातून निघून गेली होती. याप्रकरणी परभणी ग्रामीण पोलीस ठाण्यात हरवल्याची नोंद करण्यात आली होती. दरम्यान, २१ मार्च २०२६ रोजी पुणे परिसरात संबंधित मुलगी असल्याची माहिती परभणी पोलिसांना मिळाली. या माहितीच्या आधारे पोलिसांनी शोधमोहीम सुरू केली. तपासादरम्यान स्थानिकांकडून महाराष्ट्र राज्य मिसिंग ग्रुपचे अध्यक्ष शिवाभाऊ पासलकर यांच्या संपर्कात जाण्याचा सल्ला देण्यात आला. यानंतर परभणी पोलिसांनी पासलकर यांच्याशी संपर्क साधला आणि त्यांच्या मदतीने शोधकार्याला गती मिळाली. पासलकर यांनी भारती विद्यापीठ परिसरात स्थानिक पोलिसांच्या मदतीने तपास सुरू केला.

## पै. युवराज जाधव यांचा वाढदिवस उत्साहात

### अभिष्टचिंतन सोहळ्यात मान्यवरांचा गौरव



धायरी (दै. आरंभ पर्व)

समाजकार्य, अध्यात्म आणि माणुसकीची जपणूक करणारे पै. युवराज जाधव यांचा वाढदिवस वडगाव बुद्रुक येथे मोठ्या उत्साहात आणि भक्तीमय वातावरणात साजरा करण्यात आला. या निमित्ताने भव्य अभिष्टचिंतन सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते. परिसरातील नागरिक, मित्रपरिवार, कार्यकर्ते आणि विविध क्षेत्रातील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित राहून त्यांनी युवराज जाधव यांना शुभेच्छांचा वर्षाव केला.

या कार्यक्रमाचे आयोजन एलान्झा परिवार व क्रिकेट क्लब तसेच चैतन्य जाधव मित्र परिवार यांच्या वतीने करण्यात आले होते. संपूर्ण कार्यक्रमात उत्साह, आपुलकी आणि आध्यात्मिकतेचा सुंदर संगम पाहायला मिळाला. कार्यक्रमात प्रमुख उपस्थित असलेले आदमापूर येथील संत बाळूमामा देवालयाचे भाकनुकार परमपूज्य कृष्णात ढोणे महाराज यांनी आपल्या भाषणात युवराज जाधव यांच्या जीवनप्रवासावर प्रकाश टाकत त्यांचे विशेष कौतुक केले. ते म्हणाले की, "कपाळी बाळू मामांचा भंडारा लावून स्वतःला अध्यात्माच्या मार्गावर वाहून घेणारे युवराज जाधव हे खऱ्या अर्थाने परिवर्तनाची प्रेरणादायी उदाहरण आहेत. त्यांनी पैसा कमावण्यापेक्षा माणसं कमावली आणि समाजाशी नाळ जोडली. त्यांची सेवा भावना आणि त्याग वृत्ती आजच्या तरुणांसाठी मार्गदर्शक ठरावी अशी आहे." ते पुढे म्हणाले की, युवराज जाधव हे अत्यंत नम्र, निगर्वी आणि दानशूर व्यक्तिमत्त्व असून, समाजातील गरजू घटकांना मदत करण्यासाठी ते नेहमीच पुढे असतात. बाळूमामांच्या कार्यात ते सतत कार्यरत राहून समाजसेवा आणि अध्यात्म यांचा सुंदर संगम घडवून आणत आहेत. त्यामुळेच त्यांना आत्मसमाधान लाभले आहे.

या सोहळ्यास बाळूमामा देवालय, आदमापूरचे अध्यक्ष धैर्यशील राजे भोसले सरकार, हभप नवनाथ महाराज लिम्हण, गुरुदेव दीपक शिळीमकर, महापौर मंजुषा नागपुरे, नगरसेवक अॅड प्रसन्नदादा जगताप, हरिदास चरवड, काकासाहेब चव्हाण, संदीप बेलदरे, नगरसेविका जयश्री भुमकर, धनश्री कोल्हे, बिग बॉस फेम अभिजित बिचुकलें,विलास कथुरे, बाळासाहेब जाधव, दिलीप गायकवाड, सुमित बेनकर, पंकज हरपुडे, आदी मान्यवर उपस्थित होते.

कार्यक्रमादरम्यान विविध मान्यवरांनी युवराज जाधव यांच्या कार्याचा गौरव करत त्यांना शुभेच्छा दिल्या. मित्रपरिवार आणि नागरिकांनी त्यांचा वाढदिवस केक कापून, पुष्पगुच्छ देऊन आणि अभिनंदन करून साजरा केला. संपूर्ण वातावरण आनंदमय आणि प्रेरणादायी बनले होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी युवराज जाधव यांच्या पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा व्यक्त करत त्यांच्या सामाजिक आणि आध्यात्मिक कार्याला अधिक बळ मिळावे अशी अपेक्षा व्यक्त केली.

# एकविसाव्या शतकातही सुरू असलेली युद्ध दुर्दैवी

### केंद्रीय राज्यमंत्री रामदास आठवले यांचे प्रतिपादन

**पाली भाषेच्या प्रचार आणि प्रसाराची जबाबदारी आंबेडकरी चळवळीतील कार्यकर्त्यांनी हाती घेतली पाहिजे, असे आवाहन सुवर्ण डंबाळे यांनी प्रास्ताविकात केले. यावेळी डॉ. सिद्धार्थ धेंडे यांनी पाली भाषेच्या प्रसारासाठी निधी मिळावा आणि प्राथमिक शिक्षणात पाली भाषेचा समावेश करावा, अशा मागण्या केल्या. राहुल डंबाळे यांनी पाली भाषेच्या ऑनलाइन प्रशिक्षणासाठी प्लॅटफॉर्म उपलब्ध करून देण्याची तसेच डॉ बाबासाहेब आंबेडकर यांचे समग्र साहित्य पालीमध्ये अनुवादित करण्याची घोषणा यावेळी केली. साहित्य संमेलनाच्या उद्घाटन सत्रात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या पाली व बौद्ध अध्ययन विभागाचे विभाग प्रमुख डॉ. महेश देवकर यांचा जीवनगौरव पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आले. त्याचप्रमाणे पाली भाषेच्या संवर्धनासाठी प्रयत्न करणारे गायक पावा, गगन मलिक, अतुल भोसेकर आणि संमेलन अध्यक्ष बीमलेन्द्र कुमार यांचाही सत्कार करण्यात आला.**




पुणे (दै. आरंभ पर्व)

सध्या जगभरात युद्धग्रस्त परिस्थिती असल्याचे आढळून येत आहे. एकविसाव्या शतकातही सुरू असलेली युद्ध दुर्दैवी असून या परिस्थितीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा 'युद्ध नको, बुद्ध हवा', हा संदेश जगासाठी उद्बोधक आहे, असे प्रतिपादन केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी केले.

पद्मपाणी फाउंडेशन आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचा पाली व बौद्ध अध्ययन विभाग यांच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या दुसऱ्या पाली साहित्य संमेलनाचे उद्घाटन आठवले यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी संमेलनाध्यक्ष बनारस हिंदू विश्वविद्यालयाच्या पाली विभागाचे प्रमुख प्रा. डॉ. बिमलेन्द्र कुमार, गगन मलिक, भदंत हर्षबोधि महाथेरो, डॉ योजना भगत, उपमहापौर परशुराम वाडेकर, धम्मदीप वानखेडे, डॉ. करुणा जाधव, डॉ नीरज बोधी, सारंग आव्हाड, स्वागताध्यक्ष डॉ सिद्धार्थ धेंडे, डॉ. गौतम चाबुकस्वार, संयोजक राहुल डंबाळे, सुवर्णा डंबाळे, आरपीआयचे प्रदेशाध्यक्ष राजाभाऊ सरवदे आदी मान्यवर उपस्थित होते.

पाली भाषेने जगाला ज्ञान प्रदान केले आहे. विज्ञानवाद, समानता, मानवता आणि शांततेचे ज्ञान, बौद्ध तत्त्वज्ञान पाली भाषेतूनच जगभरात पोहोचले आहे. पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळावा यासाठी आपण प्रयत्न केले असून यापुढे पाली भाषेचा प्रचार आणि प्रसार मोठ्या प्रमाणावर व्हावा यासाठी शासकीय पातळीवर सर्व प्रकारची मदत करू, अशी ग्वाही आठवले यांनी यावेळी दिली. जगभरातील युद्धस्थिती, समाजातील असमानता, हिंसाचार दूर करण्यासाठी पाली भाषेचा प्रसार आवश्यक असल्याचे मतही त्यांनी व्यक्त केले.


गौतम बुद्धांचे तत्त्वज्ञान आणि समृद्ध भारतीय परंपरेचे भांडार पारिभाषेत उपलब्ध असून दुःखातून बाहेर पडून समाधान प्राप्त करण्याचा, चित्तशुद्धीचा मार्ग पाली भाषाने दाखवला आहे. त्यामुळे शालेय अभ्यासक्रमापासून पालीचा समावेश ऐच्छिक भाषा म्हणून होणे आवश्यक आहे, असे मत बिमलेंद्र कुमार यांनी व्यक्त केले. बौद्ध तत्त्वज्ञानाप्रमाणेच सामाजिक, आर्थिक, राजनैतिक अशा सर्व विषयांवरील व्यापक साहित्य पाली भाषेत उपलब्ध असल्याचे त्यांनी सांगितले. पाली भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाला असला तरी त्याचे संवर्धन व प्रसार व्हावा यासाठी कोणताही कार्यक्रम हाती घेण्यात आला नाही. राष्ट्रीय संस्कृत संस्थानच्या धर्तीवर पाली भाषेच्या संवर्धनासाठी राष्ट्रीय विद्यापीठ किंवा संस्थेची स्थापना करण्यात यावी. महाविद्यालयांमध्ये पाली भाषेच्या प्राध्यापकांची अनेक पदे रिक्त असून ती ताबडतोब भरण्यात यावी, अशा मागण्याही त्यांनी यावेळी केल्या. सध्याच्या काळात केवळ पाली भाषाच नव्हे तर बौद्ध धम्म धोक्यात आला असल्याची भीती गगन मलिक यांनी आपल्या भाषणात व्यक्त केली. सर्वसामान्यांना ज्ञान देण्याची जबाबदारी असलेल्या प्रथम पाली भाषेचा अभ्यास करणे आवश्यक आहे. बौद्ध धर्माचे संवर्धन व प्रसार करणाऱ्या भिक्षूची संख्या मर्यादित आहे. समाजातील सुशिक्षित आणि कर्तृत्ववान युवक भिक्षू होण्यास तयार नाहीत, अशी खंत व्यक्त करतानाच मलिक यांनी भिक्षू होण्याची तयारी असलेल्या युवकांच्या थायलंड मधील पंधरा वर्षांच्या प्रशिक्षणाची संपूर्ण जबाबदारी घेण्याची तयारी देखील दर्शविली.

पाली भाषा ही माणसांना जोडणारी, मैत्रीची आणि परिवर्तनाची भाषा असल्याचे भदंत हर्षबोधी महाथेरो यांनी नमूद केले.

दैनिक आरंभ पर्व हे मालक, मुद्रक, प्रकाशक सुरेखा देवेंद्र मते यांनी श्रीराम आर्ट्स अँड प्रिंटिंग प्रेस मिळकत नं. 496, भाजी मंडई समोर, सिंहगड रोड, खडकवासला, हवेली, पुणे-411024 येथे छापून भाजी मंडल समोर, सिंहगड रोड, पुणे 411024 येथे प्रकाशित केले.
संपादक : सुरेखा देवेंद्र मते (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) मा. श्री. लक्ष्मण साबळे (निवासी संपादक) प्रसिद्ध झालेल्या वृत्त व लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही, न्यायालयीन क्षेत्र पुणे बंधनकारक : Email : aparvinfo@gmail.com

• ARAMBHA PARVA is a daily Newspaper, Printed, Published and Owned by Surekha Devendra Mate • Printed at Shreeram Arts and Printing Press Milkat No. 496, Bhaji Mandai Samor, Sinhagad Road, Khadakwasala, Haveli, Pune-411024 and Published at Opp. Baji Mandal, Sinhgad Road, Pune -411024. • Mobile No-7276314142 • Editor -Surekha Devendra Mate, (responsible for editorial content as per PRB Act) • E-mail-aparvinfo@gmail.com • Newspaper Legal Cases Will Be Settled in Pune Court.

## थोडक्यात पण महत्वाचे




## बीएनसीएला सर्वोत्कृष्टतेचा पुरस्कार

**पुणे (आरंभ पर्व) : महर्षी कर्वे स्त्री शिक्षण संस्थेच्या डॉ. भानूबेन नानावटी कॉलेज ऑफ आर्किटेक्चर फॉर वूमेनने (बीएनसीए) नुकतेच नॅशनल असोसिएशन ऑफ स्टूडंट्स ऑफ आर्किटेक्चर (नासा, इंडिया) तर्फे आयोजित केलेल्या महाराष्ट्र पातळीवरील प्रदर्शनातील सादरीकरण स्पर्धेत शैक्षणिक विषयावरील सर्वोत्कृष्ट सादरीकरणाचा पुरस्कार पटकावला. हे सादरीकरण 'नासा' इंडियाच्या विभाग तीन मधील वास्तूरचनाशास्त्र (आर्किटेक्चर) महाविद्यालयांसाठी आयोजित केले आहे. हे सादरीकरण बीएनसीएतील तिसऱ्या वर्षात शिकत असणाऱ्या मोहिनी मांडके आणि चौथ्या वर्षातील अनन्या समनपुरे या विद्यार्थिनींनी केले. बीएनसीएचे प्राचार्य डॉ. अनुराग कश्यप यांनी या पुरस्काराबद्दल सहभागी विद्यार्थिनी आणि प्राध्यापकांचे अभिनंदन केले. तर महाविद्यालयातील 'नासा' विभागप्रमूख प्रा. महेश बांगड यांनी आनंद व्यक्त केला. 'नासा' इंडियाच्या या स्पर्धेत पुण्यातील ब्रिक कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने विशेष पुरस्कार मिळवला. तसेच या स्पर्धेतील महाराष्ट्रातील बांधकाम क्षेत्रातील दस्तावेजीकरण या विषयावरील प्रदर्शनाच्या सादरीकरणात कोल्हापूर येथील डी. वाय. पाटील कॉलेज ऑफ आर्किटेक्चरने सर्वोत्कृष्ट सादरीकरणाचा पुरस्कार मिळवला. 'नासा'तर्फे आयोजित करण्यात आलेले हे प्रदर्शन पाहण्यासाठी येत्या २५ मार्चपर्यंत भारती विद्यापीठ कॉलेज ऑफ आर्किटेक्चरमध्ये नागरिकांसाठी खुले ठेवण्यात आले आहे.**

## CNGच्या कामांना प्राधान्य; एलपीजी पुरवठा सुरळीत ठेवण्याच्या सूचना

**पुणे (आरंभ पर्व) : देशभरातील सीएनजी प्रकल्पांशी संबंधित कामांना प्राधान्याने गती देण्याच्या सूचना केंद्र सरकारकडून देण्यात आल्या आहेत. यासोबतच एलपीजी (LPG) पुरवठ्यात उद्भवणाऱ्या अडचणी दूर करून नागरिकांना अखंडित सेवा देण्यावरही भर देण्यात आला आहे. अशी माहिती भाजपचे राष्ट्रीय प्रवक्ते आणि पेट्रोल डीलर असोसिएशनचे राष्ट्रीय सदस्य अली दारूवाला यांनी दिली. केंद्र सरकारच्या संबंधित विभागाकडून राज्ये व केंद्रशासित प्रदेशांना पाठवलेल्या पत्रामध्ये सी एन जी पायाभूत सुविधा उभारणीतील प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. यामध्ये पाइपलाइन टाकणे, परवानग्या, रस्ते खोदकाम मंजुरी आणि विविध विभागांमधील समन्वय यावर विशेष लक्ष देण्यास सांगितले आहे. तसेच, एलपीजी पुरवठ्याबाबत काही भागांत निर्माण होणाऱ्या अडचणींचा आढावा घेऊन त्यावर तातडीने उपाययोजना करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत. वितरण व्यवस्थेत सुधारणा करून ग्रामीण व शहरी भागांमध्ये गॅस उपलब्धता सुरळीत ठेवण्याचे उद्दिष्ट आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारे, स्थानिक स्वराज्य संस्था आणि संबंधित यंत्रणांनी समन्वयाने काम करून नागरिकांना सुरक्षित, परवडणारी आणि अखंडित ऊर्जा सेवा उपलब्ध करून द्यावी, असेही स्पष्ट करण्यात आले आहे.**



## शहीद दिनानिमित्त राजगुरु, भगतसिंग, सुखदेव यांना अभिवादन

**राजगुरूनगर-किरण खुडे (दै. आरंभ पर्व)**

भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिवीर हुतात्मा शिवराम हरी राजगुरू, भगतसिंग, सुखदेव यांच्या ९५ व्या स्मृतिदिनामित राजगुरूनगर येथे अभिवादन कार्यक्रम झाला.

येथील राजगुरूनगर एसटी बसस्थानक आवारातील हुतात्मा राजगुरू, भगतसिंग व सुखदेव यांच्या स्मृती शिल्पांना विविध क्षेत्रातील मान्यवरांनी पुष्पहार अर्पण करित अभिवादन केले. यावेळी पुणे जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष विवेक वळसे पाटील, खेड तालुका शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष ॲड. देवेंद्र बुट्टे पाटील, बाजार समितीचे सभापती तथा जिल्हा परिषद सदस्य विजयसिंह शिंदे पाटील, पंचायत समितीच्या सभापती विद्या मोहिते, उपसभापती मंगेश सांवत, दिलीप डुबे, राजगुरुनगर सहकारी बँकेचे अध्यक्ष सागर पाटोळे, संचालक विजयाताई शिंदे, विनायक घुमटकर, मुकुंद आवटे, राजगुरू प्रतिष्ठानचे अध्यक्ष कोंडीभाऊ टाकळकर, बाळासाहेब सांडभोर, सुभाष होले, रेखाताई श्रोत्रिय, सुदाम कराळे बाजार समितीचे संचालक सयाजी मोहिते, वैभव नाईकरे आदी मान्यवर उपस्थित होते. दरम्यान आमदार बाबाजी काळे, माजी आमदार दिलीप मोहिते यांनी हुतात्म्यांच्या शिल्पांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. हुतात्मा राजगुरू यांचे जन्मस्थान असलेल्या राजगुरू वाड्यावर अभिवादन कार्यक्रम झाला. पोलीस निरीक्षक सुभाष चव्हाण यांच्या हस्ते वाड्यावर ध्वजारोहण झाले. यावेळी प्रांताधिकारी अनिल दौंडे, जिल्हा परिषद सदस्या दिप्ती भोगाडे, तनुजा घनवट, नगराध्यक्ष मंगेश गुंडाळ, उपनगराध्यक्ष मनोहर सांडभोर, राजगुरू स्मारक समितीचे अध्यक्ष अतुल देशमुख, सुशील मांजरे, नरेंद्र गायकवाड, शैलेश रावळ, संदिप वाळूंज, नितिन शहा, स्व. बाळासाहेब आपटे स्मृती समितीचे स्वानंद खेडकर यावेळी उपस्थित होते. राजगुरुवाड्यात दिवसभर रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. नगरपरिषदेच्या वतीने गेले तीन दिवस विविध सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले. तसेच हुतात्मा राजगुरू महाविद्यालय परिसरातील हुतात्मा स्मारक, राजगुरुनगर सहकारी बँकेत हुतात्म्यांना अभिवादन करण्यात आले.

### दर्जेदार विकासासाठी कटिबद्ध

**हुतात्मा शिवराम हरी राजगुरू स्मारक आणि परिसर विकास पुढील पिढ्यांच्या प्रेरणेशी जोडलेला विषय आहे. या स्मारकाचा सर्वांगीण विकास होणे म्हणजे येणाऱ्या पिढ्यांना आपल्या स्वातंत्र्यलढ्याची जाणीव करून देणे आणि राष्ट्रप्रेमाची भावना दृढ करणे होय. निधी मिळावा आणि स्मारकाचा दर्जेदार विकास व्हावा यासाठी मी कटिबद्ध आहे.**

**- बाबाजी काळे (आमदार ,खेड आळंदी. )**

# प्राथमिक शिक्षक पतसंस्थेच्या मोबाईल ॲप सुविधेचा शुभारंभ

**जुन्नर-दत्ता म्हसकर (दै. आरंभ पर्व)**



सुमारे १०२ वर्षांची परंपरा असलेल्या जुन्नर तालुका प्राथमिक शिक्षक सहकारी पतसंस्थेच्या "मोबाईल ॲप सुविधेचा" शुभारंभ जुन्नरचे सहाय्यक निबंधक डॉ.गजेंद्र देशमुख जुन्नर तालुका सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष अमित बेनके महाराष्ट्र राज्य सहकारी संस्था सेवानिवृत्त सहनिबंधक तानाजी कवडे यांच्या शुभहस्ते जुन्नर येथील संस्थेच्या राजा शिवछत्रपती सभागृहात संपन्न झाला. आजच्या डिजिटल युगात सभासदांना मोबाईल ॲपच्या सुविधेद्वारे स्वतःच्या सर्व प्रकारच्या खात्यांची माहिती व संस्थेची सर्व माहिती ऑनलाईन स्वरूपात पाहण्याची सुविधा उपलब्ध होत आहे अशी माहिती संस्थेचे सभापती सचिन मुळे यांनी दिली.

जुन्नर तालुक्यातील शतकोत्तर वाटचाल करत असलेल्या मोजक्या संस्थांपैकी जुन्नर तालुका शिक्षक पतसंस्था असून तालुक्यातील पतसंस्थांना आदर्श ठरेल असे काम करत आहे असे गौरवोद्गार तालुका फेडरेशनचे अध्यक्ष अमित बेनके यांनी काढले. जुन्नर तालुका शिक्षक पतसंस्थेचे कामकाज पारदर्शक व आदर्शवत असून संस्थेने महाराष्ट्र शासनाचा पुरस्कार मिळविण्यासाठी प्रयत्न करावे असे आव्हान सहकारी संस्था जुन्नरचे सहाय्यक निबंधक डॉ.गजेंद्र देशमुख यांनी केले. राज्यातील सहकारी संस्थांच्या तुलनेने सेवक पगारदार वर्गातील जुन्नर शिक्षक पतसंस्थेच्या नफ्याचा रेशो सर्वाधिक असून पतसंस्थेचे कामकाज उत्कृष्ट असल्याचे प्रतिपादन राज्य सहकारी संस्था सेवानिवृत्त जॉईंट रजिस्ट्रार तानाजी कवडे यांनी केले.

पुणे जिल्हा संघाचे सरचिटणीस खंडेराव ढोबळे यांनी संस्थेच्या प्रगतीचा आलेख मांडला.

यावेळी महाराष्ट्र राज्य शिक्षक संघाचे संपर्कप्रमुख मंगेश मेहेर जिल्हा सरचिटणीस खंडेराव ढोबळे तालुका अध्यक्ष रमाकांत कवडे राज्य प्रतिनिधी विकास मटाले भरत बोचरे जिल्हा प्रतिनिधी राम संभेराव सुनील हाडवळे संतोष पानसरे तालुका पदाधिकारी वैभव सदाकाळ अशोक बांगर प्रभाकर दिघे संदिप शिंदे दिपक मुंढे महिला आघाडी अध्यक्षा शुभदा गाढवे स्वप्नजा मोरे वैशाली कुऱ्हाडे केंद्रप्रमुख कमलाकांत मुंढे दिनेश मेहेर रवींद्र कुटे संस्थेचे मानद सचिव जितेंद्र मोरे खजिनदार सुभाष दाते माजी सभापती विजय लोखंडे अनिल कुटे अंबादास वामन नानाभाऊ कणसे पुनम तांबे दिलीप लोहकरे सुनीता वामन अविनाश शिंगोटे दत्तात्रय घोडे ज्ञानदेव गवारी सरचिटणीस उमेश शिंदे सहचिटणीस दत्तात्रेय हांडे व सभासद बंधू भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. माजी सभापती संतोष पाडेकर यांनी सूत्रसंचालन केले. उपसभापती सविता कुऱ्हाडे यांनी आभार मानले.

## खेळाला ताकद अन् देशाचे सक्षमीकरण

**मुंबई(दै. आरंभ पर्व)**

उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड (उत्कर्ष एसएफबीएल) ची टी-२० २०२६ च्या लीगसाठी 'मुंबई इंडियन्स' चे अधिकृत बँकिंग भागीदार म्हणून निवड झाली असून बँकेने या महत्वपुर्ण भागीदारीची घोषणा आज केली. बँकेसाठी हा धोरणात्मक भागीदारीचा अतिशय महत्त्वपूर्ण टप्पा आहे. या भागीदारीच्या माध्यमातून बँक आपली राष्ट्रीय स्तरावरील ओळख वाढवण्याबरोबरच देशभरातील कोट्यवधी क्रिकेट चाहत्यांशी आपले नाते अधिक दृढ करत आहे. सदर घोषणेसाठी आयोजित विशेष कार्यक्रमाला उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. गोविंद सिंग, मुख्य वित्त अधिकारी श्री. सरजुकुमार प्रवीण सिमारिया आणि कन्झ्युमर बँकिंग प्रमुख श्री. सौरभ घोष तसेच मुंबई इंडियन्स फ्रँचायझीचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. श्री गोविंद सिंग, व्यवस्थापकीय संचालक व मुख्य कार्यकारी अधिकारी, उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेड या ऐतिहासिक भागीदारीबद्दल बोलताना म्हणाले, “मुंबई इंडियन्ससारख्या संघासोबत भागीदारी करताना आम्हाला आनंद होत आहे कारण हा एक असा संघ आहे ज्यांनी कामगिरी, नेतृत्व आणि चाहतावर्गाशी संवाद यात सातत्याने नवे मापदंड प्रस्थापित केले आहेत. ही भागीदारी देशभरातील ग्राहकांशी अधिक मजबूत नाते निर्माण करण्याच्या आमच्या वचनबद्धतेचे प्रतीक आहे.




- **उत्कर्ष स्मॉल फायनान्स बँक लिमिटेडची मुंबई इंडियन्ससोबत टी20 लीग 2026 साठी अधिकृत बँकिंग पार्टनर म्हणून भागीदारी**

# शिवनेरीचा इतिहास ऐकता व पाहता येणार



**जुन्नर-दत्ता म्हसकर (दै. आरंभ पर्व)**

केंद्रीय पुरातत्व विभागाच्या माध्यमातून ऐतिहासिक शिवनेरीवर डिजिटल वॉक क्यू-आर कोड प्रणालीचा शुभारंभ रविवार दि. २२ रोजी करण्यात आला.शिवनेरीला भेट देणाऱ्या प शिवभक्त व पर्यटकासाठी ही सुविधा अनुभवसिद्ध गाईड म्हणून पर्वणी ठरणार आहे.

याप्रसंगी भारतीय विज्ञान शिक्षण आणि संशोधन संस्थेचे सहाय्यक प्रमुख प्रा. पुष्कर सोहोनी, केंद्रीय पुरातत्व विभागाचे पुरातत्वविद अधीक्षक ए. व्ही. नागणोर, डिजीटल सुविधा निर्माण करणाऱ्या गुंज इंडियाचे नितीन मेणवलीकर, सचिन जोशी, पुरातत्व विभागाचे सर्वेक्षक सहाय्यक बाबासाहेब जंगले, वनविभागाचे कर्मचारी, कुसुरचे सरपंच दत्तात्रेय ताजणे, श्री शिवाई देवी मंदिर ट्रस्टचे पदाधिकारी, कुसुर ग्रामस्थ व सह्याद्री गिरिभ्रमण संस्थेचे समन्वयक यावेळी उपस्थित होते.

यावेळी प्रा.पुष्कर सोहोनी यांच्या हस्ते शिवनेरी डिजिटल वॉक क्यू-आर कोड प्रणाली सुविधेचा शुभारंभ करण्यात आला. प्रा. सोहोनी म्हणाले, पुरातत्व विभाग हा खरा व अधिकृत इतिहासाची माहिती देण्यासाठी नेहमीच प्रयत्नशील असतो. यापुढील काळात डिजिटल वॉक संकल्पनेतून तसेच क्यू-आर कोड प्रणालीच्या माध्यमातून शिवनेरीचा खरा इतिहास ऐकायला तसेच चित्रफितीच्या माध्यमातून पाहता येणार आहे. केंद्रीय पुरातत्व विभागाचे अधीक्षक पुरातत्वशास्त्रज्ञ डॉ.अभिजित आंबेकर यांच्या संकल्पनेतून ही सुविधा निर्माण करण्यात आली आहे.

**बाबासाहेब जंगले यांनी स्वागत केले. ओंकार गरुड यांनी सुत्रसंचलन केले. संतोष केदारी यांनी आभार मानले. "सध्या भारतीय पुरातत्व विभागाच्या ८ वारसास्थळे आणि १३ तिकीट असलेल्या वारसास्थळांवर ही डिजिटल हेरीटेज वॉक सुविधा सुरु झाली आहे. पुढील काळात इतिहासाच्या पाऊलखुणांचे दाखले असणारे फोटो व्हिडीओ यामध्ये समाविष्ट केले जातील."**

**- ए. व्ही. नागणोर(पुरातत्वविद अधिक्षक,केंद्रीय पुरातत्व विभाग)**

**"जीपीएस तंत्रज्ञानाचा वापर करून त्या-त्या ठिकाणाची माहिती व इतिहास आपल्या भाषेत ऐकायला मिळणार आहे. भारतात येत्या वर्षभरात सुमारे १५० ठिकाणी 'ऑडीओ गाईड' सुविधा निर्माण करण्याचा प्रयत्न आहे. पुढील पिढीला आपला समृद्ध इतिहास चांगल्या पद्धतीने समजण्यासाठी मराठी, हिंदी, इंग्रजी, जर्मन, फ्रेंच आदी वेगवेगळ्या भाषेत माहिती उपलब्ध करून देत आहोत किंबहुना त्या-त्या ठिकाणच्या घडलेल्या ऐतिहासिक घटना कृत्रिम बुद्धिमत्तेच्या आधारे व्हिज्युअल स्वरूपात पाहता येतील."**

**- नितीन मेणवलीकर (गुंज इंडिया)**

# कॉमिक कॉन पुणे २०२५ मध्ये गेमिंगचा अनुभव वाढवला

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

रॉयल चॅलेंज पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने आपल्या 'क्रिकेट गेमिंग झोन सह पुणे कॉमिक कॉन 2025' मध्ये प्रचंड उत्साह वाढवला. या कार्यक्रमात ई-स्पोर्ट्स चाहत्यांपासून ते कॉस्प्लेअर्स आणि पॉप कल्चर प्रेमींपर्यंत सर्वजण सहभागी झाले. कॉमिक कॉन 21 ते 22 मार्च दरम्यान मेफिल्ड यश गार्डनमध्ये पार पडला. ब्रँडने या कार्यक्रमाद्वारे ई-स्पोर्ट्स क्षेत्रातील आपली वाढती रुची आणि भारतातील बदलती गेमिंग संस्कृती दाखवली.




रॉयल चॅलेंज पॅकेज्ड ड्रिंकिंग वॉटरने आपल्या रोमांचक ‘क्रिकेट गेमिंग झोन’ला पुन्हा सादर करून कॉमिक कॉनमध्ये उपस्थितांना क्रिकेटचा अनुभव नवीन पद्धतीने अनुभवण्याची संधी दिली. चाहत्यांनी वर्ल्ड क्रिकेट चॅम्पियनशिप 3 मोबाइलवर, क्रिकेट 24 प्लेस्टेशन 5 वर, आणि पूर्णपणे इमर्सिव्ह व्हीआर क्रिकेट सेटअपसाठी लांब रांगा लावल्या. दोन्ही दिवस खेळांचे मैदान भरलेले राहिले.

उत्साह वाढवण्यासाठी, भारतातील आघाडीचे गेमिंग क्रिएटर्स, ज्यात ‘स्काउट’ यांचा समावेश होता, भेटी-सत्रे आणि मैत्रीपूर्ण प्रदर्शन मॅचेससाठी उपस्थित झाले. त्यांच्या सहभागामुळे स्पर्धात्मक ऊर्जा वाढली आणि चाहत्यांशी इनफ्लुएन्सर्सचा संबंध अधिक घट्ट झाला, ज्यामुळे देशातील वेगाने वाढत असलेल्या गेमिंग संस्कृतीवर सकारात्मक प्रभाव पडला.

## आयडी फ्रेश फूडची ऑर्गेनिक सेगमेंटमध्ये प्रवेश करण्याची घोषणा

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील सर्वाधिक पसंतीचा फ्रेश फूड ब्रँड आयडी फ्रेश फूड (iD Fresh Food) ने ऑर्गेनिक सेगमेंटमध्ये प्रवेश करण्याची घोषणा करत आयडी ऑर्गेनिक बॅटर लॉन्च केले आहे. हे लॉन्च आयडीच्या त्या प्रवासातील आणखी एक महत्त्वाचा टप्पा आहे, ज्यामध्ये चव, प्रामाणिकता आणि पारदर्शकतेशी कोणतीही तडजोड न करता क्लीन-लेबल, ताजे आणि विश्वासार्ह दैनंदिन अन्नपदार्थ तयार केले जातात. आपल्या ऑर्गेनिक बॅटर रेंजसाठी कंपनी एक स्थापित ऑर्गेनिक सोर्सिंग मॉडेलद्वारे कर्नाटक आणि आंध्र प्रदेशमधील २,५०० हून अधिक शेतकऱ्यांकडून धान्य खरेदी करत आहे. या प्रक्रियेत एनजीओ सक्रियपणे शेतकरी सहभाग आणि स्थानिक पातळीवरील सहाय्य प्रदान करत आहेत.




## स्मार्ट आणि 'ऑल-इन-वन' स्वयंपाकाच्या एका नव्या युगाची सुरुवात

**मुंबई (दै. आरंभ पर्व)**

फिलिप्स होम अप्लायन्सेसने फिलिप्स वनशेफ सादर करण्याची घोषणा आज केली. स्वयंपाकासाठी हे एक नावीन्यपूर्ण, सर्वसमावेशक स्मार्ट उपकरण असून, रोजचा स्वयंपाक सोपा करण्यासोबतच भारतीय घरांसाठी पाककलेचे नवनवीन पर्याय करून पाहण्यासाठी ते तयार करण्यात आले आहे. रणवीर ब्रार यांनी मुंबईतआयोजित केलेल्या ‘शेफ्स टेस्टिंग टेबल’ या कार्यक्रमात याचे उद्घाटन झाले. पदार्थांची चव पाहून, इंटरॅक्टिव्ह फूड स्टेशन्सच्या माध्यमातून भारतातील विविध खाद्यसंस्कृतींचा आस्वाद घेण्यासाठी पाहुण्यांना या कार्यक्रमात आमंत्रित करण्यात आले होते.




## नवगतीने पीडीएपी एजीएम २०२६ मध्ये पेट्रोलियम डीलर्ससाठी ‘एव्हेग प्रो’ सादर केले

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

भारतातील अग्रगण्य फ्युएल-टेक स्टार्टअप नवगतीने पेट्रोल पंप डीलर्ससाठी ‘एव्हेग प्रो’ हे नवीन डिजिटल प्लॅटफॉर्म लॉन्च केले. या डिजिटल प्लॅटफॉर्मचे लॉंच पुण्यात झालेल्या पेट्रोल डीलर्स असोसिएशन पुणे (पीडीएपी) 2026 च्या वार्षिक सर्वसाधारण सभेत (एजीएम) करण्यात आले. या प्लॅटफॉर्ममुळे पेट्रोल पंप व्यवसाय अधिक डिजिटल आणि आधुनिक होण्यास मदत होणार आहे. हे प्लॅटफॉर्म खास भारतीय फ्युएल रिटेल क्षेत्रासाठी तयार करण्यात आले आहे. एव्हेग प्रो हे पेट्रोलियम डीलर्सना येणाऱ्या अनेक दैनंदिन अडचणी सोडवण्यासाठी तयार करण्यात आले आहे. यामध्ये विक्रीचे हाताने हिशेब जुळवणे, स्टॉकमधील फरक तपासणे, फ्लीट बिलिंग, रोख आणि इतर पेमेंटमधील फरक, रोजच्या तपासणीच्या नोंदी आणि क्रेडिट जोखीम यांचा समावेश आहे. हे सर्व महत्त्वाचे काम एकाच डिजिटल सिस्टीममध्ये करता येतात. त्यामुळे पेट्रोल पंपाचे संपूर्ण कामकाज सोपे आणि अधिक व्यवस्थित होते. हे प्लॅटफॉर्म इंधन विक्रेत्यांना विक्री, शिफ्ट व्यवस्थापन आणि एसएल5 नॉझलचे हिशेब (रिकन्सिलिएशन) सहजपणे सांभाळण्यास मदत करते. तसेच, यात लाईव्ह इन्व्हेंटरी ट्रॅकिंग, स्टॉकमधील फरक नियंत्रण, डिजिटल फ्लीट करार, एकत्रित बिलिंग, क्रेडिटवर लक्ष ठेवणे, व्हाउचर व्यवस्थापन आणि रिअल-टाइम बॅलन्स शीट पाहण्याची सुविधा उपलब्ध आहे. भारतातील पेट्रोलियम रिटेल व्यवसायातील गुंतागुंत लक्षात घेऊन हे प्लॅटफॉर्म तयार करण्यात आले आहे. यात व्हॅट, जीएसटी, सेस आणि सरचार्ज यांचे व्यवस्थापनही करता येते, त्यामुळे डीलर्सना अचूक आणि ऑडिटसाठी तयार आर्थिक नोंदी ठेवणे सोपे जाते. या लॉंचबद्दल बोलताना नवगतीचे सह-संस्थापक आणि सीईओ वैभव कौशिक म्हणाले, “एव्हेग प्रो हे इंधन विक्रेत्यांच्या रोजच्या कामातील अडचणी सोडवण्यासाठी उपाय तयार करण्याच्या आमच्या सातत्यपूर्ण प्रयत्नांचे प्रतीक आहे. भारतात अजूनही इंधन विक्री व्यवसायात अकाउंटिंग, स्टॉक तपासणी, ताळमेळ (रिकन्सिलिएशन) आणि ग्राहकांच्या क्रेडिट व्यवस्थापनासाठी वेगवेगळ्या आणि हाताने चालणाऱ्या पद्धती वापरल्या जातात.




# एसबीआय ग्रीन मॅरेथॉन सीझन ६ मध्ये पुण्याची हरित उद्याच्या दिशेने धाव

**पुणे (दै. आरंभ पर्व)**

लखनौ, चंदीगड, भोपाळ, विशाखापट्टणम, बेंगळुरू, गुवाहाटी, कोलकाता, अहमदाबाद, तिरुवनंतपुरम, जयपूर, पटना, मुंबई, चेन्नई, हैदराबाद, भुवनेश्वर आणि नवी दिल्ली यांसारख्या शहरांमध्ये प्रभावी हरित चळवळ उभारल्यानंतर, एसबीआय ग्रीन मॅरेथॉन सीझन 6 ने उत्साही पुणे शहरात आगमन केले.




ताजेतवाने रविवारी सकाळी पीडब्ल्यूडी ग्राउंड येथे फिटनेस, सामुदायिक एकात्मता आणि पर्यावरण जागरूकतेचा उत्साहपूर्ण माहोल निर्माण झाला. हजारो उत्साही धावपटूंनी एकत्र येत शाश्वततेसाठी धावण्याचा आणि हरित उद्यासाठी योगदान देण्याचा संकल्प केला. फिटनेस संस्कृती, सक्रिय रनिंग कम्युनिटी आणि शाश्वत जीवनशैलीवर वाढता भर यासाठी ओळखले जाणारे पुणे या देशव्यापी हरित उपक्रमासाठी आदर्श ठरले. शहरातील उत्साह आणि सहभागाने “हरित भारतासाठी धावा” या मॅरेथॉनच्या मूलभूत संकल्पनेला साजेशी साथ दिली. ५,००० हून अधिक सहभागी — अनुभवी धावपटू, विद्यार्थी, कुटुंबे, फिटनेसप्रेमी आणि संरक्षण दलाचे कर्मचारी — आरोग्य, सहनशक्ती आणि पर्यावरणीय जबाबदारी साजरी करण्यासाठी एकत्र आले. प्रत्येक पावलात पुण्याची आरोग्यदायी जीवनशैली आणि शाश्वत भविष्याबद्दलची बांधिलकी दिसून आली. या मॅरेथॉनला मान्यवरांच्या हस्ते औपचारिक सुरुवात करण्यात आली. श्री नंद किशोर सिंह – मुख्य महाव्यवस्थापक, एसबीआय; श्री राकेश कुमार यादव – महाव्यवस्थापक (नेटवर्क–III), एसबीआय; श्री अनिरुद्ध कुमार चौधरी – महाव्यवस्थापक (नेटवर्क–II), एसबीआय; श्री रविंद्र दुंडप्पा हितनल्ली – महाव्यवस्थापक (नेटवर्क–I), एसबीआय; श्री मनोज कुमार टाक – डीजीएम आणि सीडीओ, एसबीआय; तसेच श्री जयेश पाटील – बिझनेस डायरेक्टर, रेडिओ मिर्ची यांनी उपस्थित राहून बँकेची शाश्वतता, सामाजिक कल्याण आणि राष्ट्रनिर्मितीप्रती असलेली वचनबद्धता अधोरेखित केली. आपल्या पर्यावरणपूरक तत्वज्ञानाशी सुसंगत राहून, एसबीआय ग्रीन मॅरेथॉनने सुयोग्य आणि जबाबदार स्पर्धेचा अनुभव दिला: सेंद्रिय टी-शर्ट्स, लागवड करता येणारे बीआयबी आणि पुन्हा वापरता येणाऱ्या कापडी गिफ्ट बॅग्समुळे एकदाच वापरल्या जाणाऱ्या वस्तूंचा वापर कमी करण्यात आला. प्रभावी कचरा व्यवस्थापन प्रणालीद्वारे योग्य वर्गीकरण आणि विल्हेवाट सुनिश्चित करण्यात आली, ज्यामुळे पर्यावरणीय बांधिलकी अधोरेखित झाली. कार्यक्रमात उत्साह आणि ऊर्जा वाढवण्याचे काम रेडिओ मिर्चीच्या आरजे — आरजे निधी आणि आरजे निमिषा यांनी केले. त्यांच्या आकर्षक सादरीकरणामुळे, संवादातून आणि उत्साही उपस्थितीमुळे धावपटूंना प्रेरणा मिळाली आणि वातावरण रंगतदार राहिले. या मॅरेथॉनमध्ये ५ कि.मी., १० कि.मी. आणि हाफ मॅरेथॉन अशा श्रेणींचा समावेश होता. AIMS प्रमाणित मार्गांमुळे अचूकता, सुरक्षितता आणि सर्व स्तरांतील सहभागींसाठी उत्कृष्ट धावण्याचा अनुभव सुनिश्चित करण्यात आला.